cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१६० | सोमवार, दि.०६ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### आर्थिक संकटात भारताचे आशादायी पाऊल !

संपूर्ण जग सध्या एका वेगळ्या आर्थिक परिस्थितीतून जात आहे. अमेरिकेचे टॅरिफ धोरण, बाजारातील चढउतार, युद्धजन्य स्थिती या पार्श्वभूमीवर भारतासह संपूर्ण जगापुढे नवनवीन आव्हाने उभी राहिल्याचे दिसून येते. एकीकडे हे नकारात्मक वातावरण दाटले असताना जीएसटीतील दरकपात आणि त्यानंतर रेपो दर जैसे थे ठेवण्यासह रिझर्व्ह बँकेने घेतलेले इतर निर्णय दिलासादायकच ठरावेत.

### काटामारी करून शेतकऱ्यांना लुटणाऱ्यात दानत नाही !

नाशिकः शेतकऱ्यांचा काटा मारून (वजनामध्ये फसवणूक) कारखाने पैसे जमा करतात, पण शेतकऱ्याला मदत करायला त्यांच्यात दानत नाही, असा आरोपही त्यांनी केला. तुम्ही शेतकऱ्याचा काटा मारून मारून पैसा जमा करता आणि शेतकऱ्यांसाठी २५ लाख रुपये द्या म्हटलं तर तुम्हाला देण्याची दानत नाही, असे ते म्हणाले. ते म्हणाले की, जे लोक आमच्यावर टीका करत आहेत, त्यांना सांगतो एकदा आरशात बघून घ्या. तुम्ही असताना तुम्ही काय केलं हे एकदा आरशात बघा त्याच्यानंतर आमच्यावर टीका करा. आम्हाला खुर्च्या तोडण्यासाठी लोकांनी पाठवलेलं नाही, शेतकऱ्यांची सेवा करण्यासाठी पाठवला आहे आणि ते केल्याशिवाय आम्ही थांबणार नाही.

## थोडक्यात...

### आघाडीत मनसेच्या एन्ट्रीचा शुभारंभ ?

ठाणे : आगामी काळात राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. या निवडणुकांमध्ये सर्वात जास्त केंद्रस्थानी हे दोन्ही ठाकरे बंधू असणार आहेत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे दोन्ही भाऊ आगामी काळात राजकारणात एकत्र येण्याची शक्यता आहे. ठाकरे बंधू १८ वर्षांनी एकत्र येत आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या प्रतिष्ठेच्या बनणार आहेत. मनसेची महाविकास आघाडीत इंट्री हा अनेकांना धक्का असला तरी त्याचा शुभारंभ ठाण्यातून होणार आहे .

### तर आम्ही एमआयएम सोबत ;शंकराचार्य

शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी शिवहरमध्ये केलेल्या विधानाने देशव्यापी भूवया उंचावल्या आहेत. गोरक्षणाचा पुरस्कार करणाऱ्या कोणत्याही पक्षाला किंवा संघटनेला, अगदी एआयएमआयएमलाही पाठिंबा देऊ असे शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी म्हटले आहे. हिंदू धर्म आणि हिंदुत्वाच्या नावाखाली मते मागणारे गोरक्षणावर गप्प का आहेत? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. गाय ही कोणत्याही विशिष्ट जातीची, पंथाची किंवा पक्षाची नसून संपूर्ण भारताची ओळख दर्शवते यावर शंकराचार्य यांनी भर दिला.

### दोन उपमुख्यमंत्र्याचे पांडुरंगाला कोडे

सोलापूर : आषाढी झाल्यानंतर आता कार्तिकी एकादशीची तयारी सुरू आहे. मात्र, यंदाच्या कार्तिकी एकादशीला दोन उपमुख्यमंत्र्यांपैकी कोणते उपमुख्यमंत्री पंढरीच्या पांडुरंगाची पूजा करणार, ह्या प्रश्नाचं कोडं विठ्ठलाला म्हणजेच मंदिर समितीला पडलं आहे. आषाढी एकादशीची महापूजा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते व कार्तिकी एकादशीची महापूजा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्याची परंपरा विठ्ठल मंदिरात आहे. मात्र, राज्यात दोन उपमुख्यमंत्री असल्याने कार्तिकीची पूजा कोणत्या उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करायची याची विचारणा आता मंदिर समिती विधी व न्याय विभागाकडे करणार आहे.

### रामदास कदमांची पत्नी थेट माध्यमांसमोर

मुंबई: ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी काल कदम यांची पत्नी ज्योती कदम यांनी जाळून घेण्याचा प्रयत्न केला होता. मुलगा योगेश कदम राज्याचा गृह राज्यमंत्री आहे. त्यामुळे त्याने या प्रकरणाची सखोल चौकशी करावी. कदम यांच्या घरात १९९३ साली काय झाले होते, कदम यांच्या पत्नीने जाळून घेतले होते की, त्यांना जाळण्यात आले होते? यासाठी नार्को टेस्ट होणे गरजेचे आहे. मला त्यांनी रूग्णालयात नेलं, मला वाचवण्यासाठी बाहेर देशात ट्रीटमेंटला नेले होते, हे फार चुकीचे आरोप आहेत, आम्हाला बदनाम करू नका, आम्हाला त्रास होतो आहे, मी पहिल्यांदा मी मिडियासमोर आले आहे, असंही त्या म्हणाल्यात.

### संघाची ओळख हिंदूंचा प्रसार करणारी नाही

संघाने हिंदू धर्माच्या मूलभूत तत्त्वांचा अपमान केला आहे. हिंदू धर्म सत्याचा पाठपुरावा करतो, पण संघ नेहमी असत्य लोकांसमोर ठेवतो. त्यामुळे जगभरात हिंदू धर्माची ओळख संघामुळे धूसर होत आहे'', असा दावा हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. ''संघाचे कार्यकर्ते नेहमी हिंसाचार, खोटेपणा आणि समाजात फूट पाडणारी भाषा वापरतात. त्यामुळे त्यांच्या कार्यामुळे ची हिंदू धर्माचा गौरव न होता त्या बदनामी होते जगभरात संघाची ओळख ही हिंदुत्वाचा प्रसार करणारी संस्था म्हणून नव्हे, तर फासवादी, हिंसाचार प्रवृत्तीचे आणि समाजात ध्रुवीकरण करणारे संघटन म्हणून झाली आहेअसा आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.


### नीरव मोदीच्या खटल्याला कोर्टात कलाटणी

लंडन : पंजाब नॅशनल बँक घोटाळ्यातील मुख्य आरोपी आणि फरार हिरे व्यापारी नीरव मोदी याने त्याच्या पुन्हा प्रत्यार्पणाची सुनावणी उघडण्याची मागणी करणारी याचिका वेस्टमिन्स्टर कोर्टात दाखल केली आहे. या याचिकेवर २३ नोव्हेंबर रोजी सुनावणी होणार आहे. भारतात प्रत्यार्पण झाल्यावर तपास यंत्रणांकडून आपली चौकशी केली जाईल. त्यामुळे छळ होण्याची शक्यता आहे असा युक्तिवाद करत मोदीने कोर्टाकडे हा खटला पुन्हा सुरू करण्याची विनंती केली आहे.नीरव मोदीने प्रत्यार्पणाविरोधात यूकेच्या सर्वोच्च न्यायालयापर्यंत सर्व कायदेशीर पर्याय वापरले आहेत.

# अहवाल पाठवा शेतकऱ्यांना तात्काळ मदत -अमित शहा

अहिल्यानगर । प्रतिनिधी

**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी महाराष्ट्रातील शेतक-यांना मदतीसाठी केंद्र सरकारकडून तत्काळ सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मदत करण्यात कोणताही विलंब करणार नाहीत. लोणी येथील शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते.त्यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्याची स्थिती**



**परस्तिती जाणून घेतली सावितर अहवाल पाठवा तात्काळ मदत पाठवण्याचे आश्वासन त्यांनी दिले.**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा आज शिर्डी, राहाता आणि कोपरगाव दौऱ्यावर आहेत.

दौ-याची सुरुवात त्यांनी सकाळी शिर्डी साईबाबा मंदिरात जाऊन साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन केली. समाधीचे दर्शन घेतल्यानंतर शाह यांच्या हस्ते साईबाबांची पाद्यपूजा करण्यात आली, तसेच शिर्डी माझं पंढरपूर ही छोटी आरतीही करण्यात आली. दर्शनानंतर साईबाबा संस्थानच्या वतीने शहा यांचा शॉल आणि साईबाबाची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री

### त्रिमूर्ती व्यापाऱ्यांपेक्षा कमी नाहीत

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांबद्दल बोलताना ते म्हणाले की काल देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांची माझ्याशी बैठक झाली. राज्यातील या त्रिमूर्ती पैकी एकही व्यापारी नाही, पण व्यापाऱ्यापेक्षा कमी नाहीत. कार्यक्रमाला बोलावले, पण चर्चा मात्र शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत केली. मी त्यांच्याकडून अहवाल मागवला आहे. मोदी सरकार शेतकऱ्यांना तात्काळ मदत करेल, त्यात वेळ वाया घालणार नाही असे अश्वासन त्यांनी दिले.

एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, जलसंपदामंत्री व पालकमंत्री ▶▶ पान २ वर

# ऊस उत्पादकाला मदतीची गरज सक्तीनं वसुली चुकीची-शरद पवार



पुणे । प्रतिनिधी

ऊसबिलातून प्रति टन १५ रुपयांची कपात करुन त्यापैकी ५ रुपये पूरग्रस्त शेतकऱ्यांना तर १० रुपये मुख्यमंत्री सहायता निधीत जमा होणार आहेत. सरकारच्या या निर्णयाला शेतकरी संघटनांकडून विरोध करण्यात आला होता.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पुण्यात पत्रकारांसोबत संवाद साधला. ज्यांचं नुकसान झालं त्याच ऊस उत्पादकांकडून मोठी रक्कम मुख्यमंत्री निधीला देण्याचा घेतला आहे, ऊस उत्पादाकांकडून ▶▶ पान २ वर

> **सरकारचा निर्णय नेमका काय?**
>
> मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ऊस गाळप मंत्री समितीच्या बैठकीत एक निर्णय घेण्यात आला होता. त्या निर्णयानुसार ऊसबिलातून प्रति टन १५ रुपयांची कपात करुन त्यापैकी ५ रुपये पूरग्रस्त शेतकऱ्यांना तर १० रुपये मुख्यमंत्री सहायता निधीत जमा होणार आहेत. सरकारच्या या निर्णयाला शेतकरी संघटनांकडून विरोध करण्यात आला होता. ऊस गाळपातून प्रतिटन मुख्यमंत्री सहाय्यता निधी, वसंतदादा साखर संस्था, राज्य साखर संघ, साखर संकुल निधी, गोपीनाथ मुंडे ऊसतोडणी महामंडळ यासाठी कपात केली जाते. नव्या निर्णयानंतर प्रतिटन २७.५० रुपये कपात होणार आहे.

# आष्टीत ३५ हजाराच्या बनावट नोटा पकडल्या

आष्टी। प्रतिनिधी

**बीड शहरामध्ये यापूर्वी बनावट नोटा प्रकरण उघडकीस आली होती त्यानंतर त्याचे छत्रपती संभाजीनगर कनेक्शन उघड झाल्यानंतर पुन्हा एकदा आष्टी शहरांमध्ये ३५ हजार रुपयांच्या पाचशे रुपयांच्या बनावट नोटा पकडण्यात आल्या याप्रकरणी आष्टी पोलिसांनी एका व्यक्तीस ताब्यात घेतले आहे.**

मागील काळात बीड शहरामध्ये क्षीरसागर नामक व्यक्तीस ताब्यात घेऊन त्याच्याकडून बनावट नोटा हस्तगत केल्या होत्या हा गुन्हा दाखल झाल्यानंतर याची पाळीमुळे थेट छत्रपती संभाजी नगर मधील औद्योगिक वसाहती मध्येच रुजले केले या ठिकाणी बनावट नोटाचा छापखाना




समोर आला त्यानंतर शिरूर तालुक्यातील एक तरुण यामध्ये ताब्यात घेतला गेला आता यातच आष्टी शहरांमध्ये आष्टी ते शिंदेवाडी फाटा जाणाऱ्या रोडलगत ▶▶ पान २ वर

# धीर सोडू नका, खचू नका; माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा कपिलधारवाडीच्या ग्रामस्थांना दिलासा

बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कपिलधारवाडी या ठिकाणी अक्षरशः अख्खे गावच स्थलांतरीत करावे लागल्याची दुर्दैवी वेळ आली आहे. घराला तडे गेले, भिंती पडल्या, रस्ते खचले, पहावे तिकडे भेगा पडल्याचे चित्र असून गावकरी भयभीत झाले आहेत.**

शनिवारी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी कपिलधारवाडीला भेट देऊन



पाहणी करत धीर सोडू नका, खचू नका म्हणत याबाबतीत मी स्वतः लक्ष देऊन लवकरात लवकर जागा उपलब्ध करून घेऊन पुनर्वसनासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगून गावकऱ्यांना धीर दिला. कपिलधारवाडीला अक्षरशः निसर्गाचा कोपच झाला आहे. प्रत्येक घराला तडे गेले, भिंती पडू लागल्या, रस्ते खचू लागले, गावकरी भयभीत होऊन घरातील वस्तू हातात घेऊन कपिलधार मंदिराकडे स्थलांतरित झाले. शंभर उंबऱ्याचे असलेले हे गाव ५०० ते ६०० लोकसंख्या असून ज्यामध्ये महिला-पुरुष आणि लहान लेकरांचा समावेश आहे. आयुष्यभर कष्टाने पै-पै करून कमावलेल्या संसाराला सोडून घरादारासहित महिला वृद्ध गाव सोडून निघून गेले आहेत. अशा संकटात फोटोसेशन करून आश्वासन देणाऱ्यांपेक्षा जयदत्त अण्णाच आपले पुनर्वसनाचे काम करू शकतात अशी खात्री या गावकऱ्यांना झाली. भयभीत असलेल्या ▶▶ पान २ वर

# मनोज जरांगे पाटील यांचा पंकजा-धनंजय मुंडेंना इशारा

## मराठा आरक्षणाबाबत हल्लेखोर विधान

बीड । प्रतिनिधी

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्यातील सध्याच्या आरक्षणवादावरून आणि राजकीय हालचालींवर तीव्र टीका करताना परकीय इशारे लक्ष्य केले. विजय वडेट्टीवार यांच्या जीआर रद्द करण्याच्या मागणीवरून उफाळलेल्या वादावर बोलताना जरांगे यांनी पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांनाही चेतावणी दिली आहे.

**मुखपृष्ठ विधान ''मराठ्यांच्या नादी**



**लागली तर अस्तित्व धोक्यात''**

जरांगे म्हणाले की, ''त्या दोघांनी भुजबळच्या नादी लागू नये; मराठ्यांच्या नादी लागण खूप घातक आहे. खूप कष्ट करून त्याठिकाणी ▶▶ पान २ वर

# अनावश्यक एक्स-रेमुळे कर्करोगाचा संसर्ग

नवी दिल्ली । प्रतिनिधी

वैद्यकीय क्षेत्रात तंत्रज्ञानाने क्रांती घडवून आणली आहे, पण अनावश्यक रेडिओलॉजिकल तपासण्या जसे की एक्स-रे आणि सीटी स्कॅनचा वाढता वापर रुग्णांसाठी धोकादायक ठरत आहे. नुकतेच दिल्लीतील राम मनोहर लोहिया रुग्णालयात आयोजित न्यूरोलॉजिकल सर्जन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात डॉ. आर. एस. मित्तल यांनी हे मत व्यक्त केले.

त्यांनी सांगितले की, वारंवार केल्या जाणा-या रेडिओलॉजी तपासण्यांमुळे होणारा विकिरण धोका, विशेषत: २० वर्षांखालील रुग्णांमध्ये कर्करोगाचा धोका १० टक्क्यांपर्यंत वाढवू शकतो. या प्रशिक्षण कार्यक्रमात विविध राज्यांमध्ये वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी सहभागी झाले होते, ज्यांना १५ ते ४० वर्षांचा अनुभव असलेल्या डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना रुग्णांची तपासणी कशी करावी, आजार कसा ओळखावा, उपचाराची गरज कधी आहे हे समजून घेणे, गरज नसताना शस्त्रक्रिया (सर्जरी) टाळणे आणि एक उत्तम न्यूरो सर्जन कसे बनायचे याचे प्रशिक्षण देण्यात आले.सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष आणि न्यूरो सर्जन प्रो. आर. एस. मित्तल म्हणाले की, तंत्रज्ञानावरील अति-अवलंबनामुळे मॅन्युअल तपासणीची कला कमकुवत होत आहे. अत्यंत आवश्यक असल्याशिवाय रेडिओलॉजी तपासणी टाळली पाहिजे असे त्यांनी सांगितले. मॅन्युअल तपासणीला प्रोत्साहन दिल्यास केवळ रुग्णांचे आरोग्यच जपले जाणार ▶▶ पान २ वर

# सहा कोटी मुलांसाठी आधार अपडेटचे शुल्क माफ

मुंबई । प्रतिनिधी

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण अर्थात यूआयडीएआयने ७-१७ वर्ष वयोगटातील मुलांसाठी आधार बायोमेट्रिक अपडेटचे शुल्क माफ केले आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार ही सवलत १ ऑक्टोबर पासून लागू झाली असून ती एक वर्षासाठी उपलब्ध असेल. यामुळे सुमारे ६ कोटी मुलांना फायदा होईल.

पाच वर्षांखालील मुलांची आधार नोंदणी त्यांचे छायाचित्र, नाव, जन्मतारीख, लिंग, पत्ता आणि जन्म प्रमाणपत्राद्वारे होते. या वयात बोटांचे ठसे आणि डोळ्यांच्या बुबुळांचे बायोमेट्रिक्स घेतले जात नाहीत, कारण ते पूर्णपणे विकसित झालेले नसतात. यामुळे, विद्यमान नियमांनुसार, मुलाचे वय ५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर, आधारमध्ये बोटांचे ठसे, डोळ्यांच्या बुबुळांचे स्कॅन आणि छायाचित्र अपडेट अनिवार्य आहे. याला पहिले अनिवार्य बायोमेट्रिक अपडेट म्हटले जाते. १५ वर्षे वय पूर्ण झाल्यानंतर, पुन्हा बायोमेट्रिक्स अपडेट करणे आवश्यक आहे, ज्याला दुसरा एमबीयू म्हणतात. ५-७ आणि १५-१७ वर्षे वयोगटात ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०४ ऑक्टोबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८४.०० क्विंटल | २,३०१ | २,८८७ | २,५३९ |
| ज्वारी/हायब्रिड: १०७.५० क्विंटल | २,००० | २,८८६ | २,३४४ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ०.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| उडीद : ६१.०० क्विंटल | ३,९०१ | ५,५०० | ५,०२० |
| बाजरी: १२५.५० क्विंटल | २,१५० | २,८५१ | २,६१३ |
| मुग: १.५० क्विंटल | ७,७५१ | ७,७५१ | ७,७५१ |
| सोयाबीन: ३०.०० क्विंटल | ३,२०० | ३,८०० | ३,५६६ |
| हरभरा: ८.५० क्विंटल | ४,४०० | ६,४०१ | ५,०३३ |

# देशभरातील बँकांमध्ये १.८४ लाख कोटी रुपये पडून

नवी दिल्ली । प्रतिनिधी

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी एक मोठी घोषणा केली असून भारतीय बँका आणि नियामक संस्थांमध्ये नागरिकांचे सुमारे १.८४ लाख कोटी रुपये पडून आहेत, ज्यावर अद्याप कोणीही दावा केलेला नाही. हे पैसे पूर्णपणे सुरक्षित असून लवकरच ते मूळ दावेदार किंवा त्यांच्या कुटुंबांना परत केले जातील असे अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केले. यासाठी गांधीनगरमध्ये आपकी पूंजी, आपका अधिकार' या तीन**



**महिन्यांच्या विशेष मोहिमेची सुरुवात करण्यात आली आहे.**

वित्त सेवा विभागाच्या माहितीनुसार, ही १.८४ लाख कोटी रुपयांची रक्कम वेगवेगळ्या ठिकाणी वितरित आहे. ठेवी आणि विमा: निष्क्रिय बँक ठेवी, विमा कंपन्यांमधील रक्कम, लाभांश, म्युच्युअल फंड आणि पेन्शन फंडमधील रक्कम यांचा यात समावेश आहे. अर्थमंत्र्यांनी जनतेला आश्वासन दिले की, हा पैसा केवळ कागदी अंक नसून सामान्य कुटुंबांची कष्टाची कमाई आहे. हे सर्व पैसे दावेदारांना परत मिळेपर्यंत सरकार संरक्षक म्हणून काम करेल. हा अनक्लेम्ड पैसा सध्या बँका, भारतीय रिझर्व्ह बँक आणि गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधीमध्ये जमा आहे. तुम्हीही आरबीआयच्या यूडीजीएएम पोर्टलवर जाऊन तुमच्या कुटुंबातील किंवा तुमच्या नावाने दावा न केलेली कोणतीही रक्कम आहे का, हे तपासा आणि या ऐतिहासिक मोहिमेचा लाभ घ्या. नागरिकांनी केलेली बचत त्यांना किंवा त्यांच्या कुटुंबांना परत मिळावी, हा आहे. हे अभियान '३-अ' मॉडेलवर आधारित आहे. नागरिकांत जागरूकता म्हणून नागरिकांना त्यांच्या मालमत्ता कुठे आहेत, ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# आर्थिक संकटात भारताचे आशादायी पाऊल !

संपूर्ण जग सध्या एका वेगळ्या आर्थिक परिस्थितीतून जात आहे. अमेरिकेचे टॅरिफ धोरण, बाजारातील चढउतार, युद्धजन्य स्थिती या पार्श्वभूमीवर भारतासह संपूर्ण जगापुढे नवनवीन आव्हाने उभी राहिल्याचे दिसून येते. एकीकडे हे नकारात्मक वातावरण दाटले असताना जीएसटीतील दरकपात आणि त्यानंतर रेपो दर जैसे थे ठेवण्यासह रिझर्व्ह बँकेने घेतलेले इतर निर्णय दिलासादायकच ठरावेत. भारतात सध्या सणासुदीचा हंगाम सुरू आहे. अशा काळात बाजारपेठेत व पर्यायाने अर्थव्यवस्थेत चैतन्य भरण्यासाठी हे निर्णय निश्चितच महत्त्वाचे ठरू शकतात. भारतीय रिझर्व्ह बँकेचे पतधोरण हा नेहमीच उत्सुकतेचा विषय असतो. त्यामुळे समितीच्या बैठकीत काय निर्णय होणार, रेपोदरामध्ये बदल होणार की ते जैसे थे राहणार, याबाबत उत्सुकता होती. रेपो दर म्हणजे आरबीआयकडून इतर बँकांना कर्जपुरवठ्यासाठी ठेवला जाणारा व्याजाचा दर. तथापि, आरबीआयने व्याजदरात कोणताही बदल न करता रेपो दर ५.५ टक्क्यांवर स्थिर ठेवण्याची भूमिका घेतली.

व्याजदरात कपात न होणे, ही एरवी बाजारासाठी नकारात्मक बातमी. परंतु, आरबीआयने डिसेंबरमध्ये व्याजदर कपातीचे संकेत दिले. वर्षाअखेरीस व्याजदर कमी करण्यास पूर्णपणे वाव असल्याचे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी स्पष्ट केले. परिस्थिती आटोक्यात राहिली, तर डिसेंबरमध्ये पाव टक्क्याची कपात होऊ शकेल, असा अंदाज बँकिंग क्षेत्रातील मंडळी व्यक्त करताना दिसतात. चालू वर्षाचा विचार करता आत्तापर्यंत सामान्यांच्या कर्जावरील व्याजात एक टक्क्याची कपात झाली आहे. त्यात डिसेंबरमध्ये भर पडली, तर तो मोठा आधार असेल. स्वाभाविकच त्यातून बाजारामध्ये उत्साहवर्धक वातावरण निर्माण होण्यास मदत होऊ शकेल. दसरा, दिवाळीचा हंगाम पाहता घरे, वाहन तसेच ग्राहकोपयोगी वस्तूंच्या खरेदीमध्ये याचे परिणाम दिसू शकतात. जीएसटीचे पूर्वी ५, १२, १८ व २८ टक्के असे चार स्तर होते. यातील १२ व २८ टक्के हे दोन स्तर रद्द करण्यात आले आहेत. सध्या केवळ ५ व १८ टक्के असे दोन स्लॅब ठेवण्यात आले आहेत. स्वाभाविकच वाहने, इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या किमतीत मोठी घट झाली असून, विजयादशमीच्या मुहूर्तावर बाजारपेठेत तेजी दिसून आली. दिवाळीतही असाच उत्साह दिसल्यास नवल नाही. आरबीआयचा आणखी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे भारतीय रुपयाच्या आंतरराष्ट्रीयीकरणाचा. हा केवळ आर्थिक धोरणातील बदल नसून, जागतिक पटलावर भारताची आर्थिक स्वायत्तता सिद्ध करण्याचा आणि अमेरिकन डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्याचा एक धोरणात्मक प्रयत्न आहे. आरबीआयकडून आता शेजारी देशांसोबत ऊपयामधील व्यापाराला प्रोत्साहन देणे, याअंतर्गत भारतातील अधिकृत डीलर बँकांना आता भूतान, नेपाळ आणि श्रीलंका या देशांतील संस्थांना भारतीय रुपयांमध्ये कर्ज देण्याची परवानगी देण्यात आली आहे. याचा थेट परिणाम म्हणजे या देशांसोबतचा व्यापार अधिक सुलभ, जलद आणि कमी खर्चात होऊ शकतो. आतापर्यंत डॉलरमध्ये होणारे बिलिंग आणि व्यवहार आता थेट रुपयात करता येतील. यामुळे दोन्ही बाजूंचा विनिमय खर्च वाचेल. या निर्णयामुळे दक्षिण आशियाई प्रदेशात रुपयाचा वावर आणि स्वीकारार्हता वाढण्यास मोठी मदत होऊ शकते. परकीय संस्थांना कर्ज देणे जोखमीचे, हेही खरेच. परंतु या धोरणात्मक पावलामुळे मिळणारे फायदे अधिक असतील, अशी मांडणी केली जाते. दुसरा निर्णय म्हणजे प्रादेशिक चलनांसाठी संदर्भ दरांची म्हणजे रेफरन्स रेटची घोषणा. आतापर्यंत आरबीआय प्रामुख्याने डॉलर, युरो, पाऊंड आणि येन यांसारख्या प्रमुख जागतिक चलनांच्या तुलनेत रुपयाचा विनिमय दर प्रसृत करत असे. मात्र, आता नेपाळी रुपया, भूतानी चलन आणि श्रीलंकन रुपया यांसारख्या प्रादेशिक चलनांसाठीही आरबीआय अधिकृत संदर्भ दर जाहीर करेल. यामुळे शेजारी देशांसोबत व्यापार करताना विनिमय दरावरून होणारे वाद टळेल आणि आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता येईल, अशी अपेक्षा असेल. तिसरा निर्णय म्हणजे 'विशेष रुपी व्होस्ट्रो खात्यांच्या गुंतवणुकी'ची व्याप्ती वाढवणे होय. रशिया-युक्रेन युद्धानंतर रशियावर आर्थिक निर्बंध लागले, तेव्हा भारताने त्यांच्याकडून तेल खरेदीसाठी डॉलरऐवजी रुपयात व्यवहार करण्यासाठी ही प्रणाली सुरू केली होती. या व्यवस्थेत रशियन बँका भारतीय बँकांमध्ये आपले व्होस्ट्रो खाते उघडून त्यात रुपया जमा करत होत्या. मात्र, भारताकडून पुरेशी खरेदी होत नसल्याने रशियाच्या खात्यात प्रचंड प्रमाणात रुपये पडून होते, ज्याची गुंतवणूक करणे शक्य नव्हते. काही महिन्यांपूर्वी सरकारने या निधीला सरकारी रोख्यांमध्ये गुंतवणूक करण्याची परवानगी दिली होती. आता आरबीआयने ही व्याप्ती वाढवत हा पैसा खासगी कंपन्यांच्या कॉर्पोरेट बॉण्ड्स आणि कमर्शियल पेपर्समध्येही गुंतवण्यास परवानगी दिली आहे. यामुळे परदेशी बँकांना त्यांची रक्कम भारतात गुंतवून अधिक परतावा मिळवण्याची संधी मिळेल आणि ते व्होस्ट्रो खाती उघडण्यास अधिक प्रोत्साहित होतील. परिणामी, भारताच्या कॉर्पोरेट बॉण्ड मार्केटलाही अधिक चालना मिळेल. या धोरणांमुळे दक्षिण आशियात भारताचा आर्थिक प्रभाव वाढू शकतो. त्याचबरोबर न्यूयॉर्क किंवा लंडनसारख्या जागतिक आर्थिक केंद्रांवरील अवलंबित्वही कमी होऊ शकते. अर्थात हा प्रवास तेवढाही सोपा नसेल. त्यासाठी अनेक लहान-मोठी ठोस पाऊले उचलावी लागतील. मात्र, धोरण सातत्य दाखविल्यास भारतीय अर्थव्यवस्थेला अधिक मजबूत आणि प्रभावशाली बनवण्यास निश्चितच संधी असेल. आरबीआयने व्याजदरात कपात केली नसली, तरी महागाई आणि जीडीपीबद्दलचे सकारात्मक अंदाज, रुपयाला जागतिक पातळीवर नेण्याची महत्त्वाकांक्षी यामुळे बाजारातील वातावरण सध्या पॉझिटिव्ह वळणावर आहे, हे नक्की.

## श्री महालक्ष्मी विद्यालयाच्या शिरपेचात दुसऱ्यांदा मानाचा तुरा!

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या बीड जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत १० मीटर (वय गट:१७) शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थी चि. तानाजी काळे याने यशस्वी कामगिरी करून प्रथम क्रमांक मिळविला. त्या नंतर त्याची छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या विभागीय रायफल शूटिंग स्पर्धा १० मीटर (वय गट:१७) या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. ०४ ऑक्टोबर रोजी झालेल्या विभागीय स्पर्धेचा निकाल ०५ ऑक्टोबर रोजी जाहीर झाला. यामध्ये चि. तानाजी काळे याने तृतीय क्रमांक पटकावला. छत्रपती संभाजी नगर विभागीय स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक पटकावत श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाच्या शिरपेचात दुसऱ्यांदा मानाचा तुरा रोवण्याची यशस्वी कामगिरी चि. तानाजी काळे याने केली. त्याच्या या उज्ज्वल यशाबद्दल त्याचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.**

बीड शहरापासून जवळ असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी तानाजी सुभाष काळे या विद्यार्थ्यांने बलभीम महाविद्यालयात बुधवार दिनांक ०१ ऑक्टोबर रोजी बीड जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय रायफल शुटिंग स्पर्धेत १० मीटर (वय गट:१७) प्रथम क्रमांक मिळविला. त्यानंतर ०४ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या विभागीय शालेय शूटिंग क्रीडा स्पर्धा १० मीटर (वय गट:१७) सन २०२५ साठी त्याची निवड झाली. या स्पर्धेसाठी मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड एकूण सहा जिल्ह्यातील दहा खेळाडू विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत चि. तानाजी काळे याने तृतीय क्रमांक मिळवत श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाच्या शिरपेचात दुसऱ्यांदा मानाचा तुरा रोवण्याचे काम केले आहे.



छत्रपती संभाजी नगर विभागीय स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक मिळवलेल्या चि. तानाजी काळे याचे शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष गणेश वाघ सर, सचिव नामदेव वाघ सर, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, गावातील प्रतिष्ठित नागरिक राजेश भाऊ देवकते, संतोष नरवडे, त्याचे वडील सुभाष काळे, शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय चव्हाण सर, आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे, श्रीमती साळुंके, श्रीमती सानप मॅडम यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह, नातेवाईक आणि मित्र परिवारांनी तोंडभरून कौतुक करत त्याचे अभिनंदन करून त्याच्या पुढील स्पर्धेसाठी त्याला शुभेच्छा दिल्या.

## श्री दत्त संस्थान बालाघाट येथे आश्विन शुद्ध पौर्णिमे निमित्त धार्मिक सोहळ्याच्या आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

**श्री दत्त संस्थान बालाघाट येथे पं. पु. ष. ब्र. श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने आणि दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवार, दि. ०६ ऑक्टोबर २०२५ रोजी आश्विन शुद्ध पौर्णिमा निमित्त भव्य धार्मिक सोहळा आयोजित केला जात आहे.**

या सोहळयाला सर्व पंचक्रोशीतील भाविकांना या उत्सवाला उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आयोजकांनी मनःपूर्वक आवाहन केले आहे. सोहळयाचे आयोजक म्हणतात की, हा उत्सव भक्तिरसात हरवून जाण्याची आणि दत्ताच्या दर्शनाचा आनंद अनुभवण्याची सुवर्णसंधी आहे. या उत्सवात विविध धार्मिक कार्यक्रम, भजन, कीर्तन व दत्त महाराजाच्या जीवनाची माहिती देणारे प्रवचन आयोजित केले जाणार आहे. उपस्थित राहणाऱ्या भाविकांना गंगाबाई बळीराम रसाळ (मांजरसुंबा) यांच्या अन्नदानातून महाप्रसाद दिला जाणार आहे. श्री दत्त संस्थान बालाघाट तर्फे सर्वांना नम्र निमंत्रण देण्यात आले असून, आयोजकांनी सांगितले की, ''भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या पौर्णिमेच्या दिवशी दत्ताच्या चरणी मनःपूर्वक भक्ती अर्पण करावी.



## पान ६ वरून...

### कर्जमाफीसह एकरी

भाई राहुल सोळंके,भाई अशोक कुलकर्णी,भाई आनंत चव्हाण, भाई भास्कर कांबळे,प्रा. बालासाहेब येवले, भाई सलीम खा पठाण,भाई श्रीराम शेवाळे,जनार्धन कुदळे,सोनाजी जाधव,गोरख आढाव,ज्ञानोबा आगरकर,सतीश शेजुळ,चांगदेव शेजुळ आदींनी उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय माजलगाव यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली असून वरील मागण्या तात्काळ मान्य न केल्यास दि १० ऑक्टोबर रोजी सकाळी १०:०० वाजता पात्रुड येथील लोणगाव फाट्यावर तसेच दिनांक ११ ऑक्टोबर रोजी सकाळी १०:०० वाजता मोठेवाडी फाटा छोटीवाडी येथे शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

------------

### चिंचवण येथे मंगळवारी

देवीची दोन दिवसीय यात्रेचे याठिकाणी आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये देवीचा पालखी सोहळा दि.७ ऑक्टोबर २०२५ आश्विन शुध्द पोर्णिमा, मंगळवार रोजी रात्री ८ वाजता श्री.जगदंबा देवीचा छबिना पालखी मिरवणूक उत्साहात निघणार आहे. या मिरवणुकीसाठी गावातीलच नव्हे तर पंचक्रोशीतील असंख्य भाविक मोठ्या श्रध्देने उपस्थित राहतात. तसेच या यात्रेचे मुख्य आकर्षण असलेली पारंपारिक कुस्ती दंगल दि.८ ऑक्टोबर २०२५ बुधवार रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत रंगणार आहे. परिसरातील नामवंत व बलाढ्य मल्ल मैदानात उतरणार असून कुस्तीप्रेमींसाठी हा थरारक सोहळा ठरणार आहे. यासाठी सुरुवातीचे बक्षीस हे १० रुपयांपासून ते अंतिम बक्षीस ५ हजार रुपयांपर्यंत असणार आहे. तरी यात्रा कमिटी चिंचवण व समस्त गांवकरी यांनी पंचक्रोशीतील भाविकांना या पालखी सोहळा, भजन, दंडपट्टा आणि जंगी कुस्त्यांचा आनंद घेवून यात्रेची शोभा वाढवावी असे आवाहन केले आहे. ही यात्रा केवळ धार्मिकच नव्हे तर सांस्कृतीक परंपरेचेही प्रतिक ठरणार असून, चिंचवण नगरी पुन्हा एकदा भक्तिभाव व उत्साहाने उजळून निघणार आहे.

------------

### शेतकऱ्यांच्या खरडून गेलेल्या

झाली आहे. अशा परिस्थितीत महसूल विभागाचे अधिकारी आमच्या बागायती जमिनीची नोंद सातबारावर असताना सुद्धा कोरडवाहू जमिनीचे पंचनामे सरसकट करत आहेत. बागायती असूनही आम्हाला त्याचे बागायती नुकसान आर्थिक मदत मिळत नाही. अशा विविध मागण्या दगडगाव, औरंगपूर कुकडा येथे धरणे आंदोलनास बसलेल्या शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह शेतकऱ्यांनी केली आहे. माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी तात्काळ दि ३ ऑक्टोबर रोजी सर्व आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांची प्रत्यक्ष जाऊन भेट घेतली. त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या. त्यांच्या समवेत माजी उपसभापती भीष्माचार्य दाभाडे उपस्थित होते. त्यानंतर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी, गेवराई मतदार संघासह बीड जिल्ह्यात अतिवृष्टी आणि गोदावरी व सिंदफणा नदीला पाणी सोडल्याने आलेल्या पूर परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे सर्व उभे पिके वाहून गेली असून त्यांच्या जमिनी खरडून वाहून गेलेल्या आहेत. पिकाची नुकसान भरपाई मिळेल त्यानंतर पुन्हा पेरणीही केली जाईल परंतु संपूर्ण जमिनीवरची मातीच वाहून गेली असेल तर त्या शेतकऱ्याने पेरणी करायची कुठे? असा प्रश्न उपस्थित करून खरडून जमिनी वाहून गेलेल्या शेतकऱ्यांना इतर ठिकाणाहून गाळ किंवा काळी माती शेतामध्ये टाकून पुनर्भरण करण्यासाठी शासनाने आर्थिक मदत करावी आणि पुन्हा त्यांच्या पिकासाठी जमीन उपलब्ध करून द्यावी अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कृषी मंत्री दत्ता मामा बारणे यांना निवेदनाद्वारे केली आहे.

------------

### बीड, शिरूर कासार

पाटील उपस्थित होते.या मान्यवरांच्या हस्ते हिंगणी खुर्द, जेबा पिंपरी, कपिलधारवाडी, आर्वी, मार्करवाडी, शिरापूर गात, फुलसांगवी, गाजीपूर, हाजीपूर, तरडगव्हाण, हिवरसिंगा जांब, ढोकवड, कमलेश्वर धानोरा, साक्षाळ पिंपरी, उमरद जहागीर, बहादरपूर आणि कपिलधारवाडी या गावांमध्ये किराणा किटचे वितरण करण्यात आले. यावेळी गावचे सरपंच, पदाधिकारी, कार्यकर्ते, पूरग्रस्त नागरिक उपस्थित होते.

------------

### शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी

जिल्ह्यातील ११० कर्मचारी कर्मचाऱ्यांवर तसेच महाराष्ट्रातील २२०० शिक्षक कर्मचारीवर बेरोजगारीची कुऱ्हाड केंद्र शासनाच्या या निर्णयामुळे कोसळली आहे. २००४ पासून महाराष्ट्रातील या प्रकल्पात काम दिलेल्या सेवेचा मोबदला म्हणून २०१६ पासून राज्य शासन तथा केंद्र शासन यांच्याकडे शासकीय सेवेत समायोजन करण्यासाठी साधी वेळोवेळी पाठपुरावा आम्ही करत आहोत . करिता राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी व यावर तत्काळ निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत समयोजन करण्यात यावे अशी मागणी यावेळी करण्यात आली . तसेच यामध्ये वयाची पन्नाशी ओलांडली अश्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या एकत्रित सानुग्रह अनुदान देऊन पुनर्वसन करण्यात यावे.यासाठी बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पपातील शिक्षक, लिपीक, शिपाई कर्मचारी उपस्थित होते.यावेळी माजी प्रकल्प संचालक ओमप्रकाश गिरी सर यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना शब्द दिला की भाजपा कामगार मोर्चा बीड च्या वतीने एकदिवसीय लाक्षणिक आंदोलन साठी पाठिंबा देतो .व भाजपा कामगार मोर्चा च्या माध्यमातून शासन स्तरावर शिक्षण विभाग, कामगार विभाग कडे पाठपुरावा करून आपला प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करतो.तसेच यावेळी क्षेत्रीय अधिकारी शेख अफसर सर यांचे पण मोलाचे मार्गदर्शन केले.राज्य सचिव शंकर झाडे हे आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातील शिक्षक कर्मचारी यांनी आजपर्यंत संविधानीक पद्धतीने शांततेत च्या मार्गाने आंदोलन, निवेदन देऊन मागणी शासनाकडे केली पण शासनाने आमच्या कडे पुर्ण दुर्लक्ष केले आमचा शासनाने आंत पाहु नाही.लवकर निर्णय न घेतल्यास यापलीकडे जाऊन तिर्व आंदोलन करण्यात येईल असे म्हटले.तसेच राहुल घनगाव जिल्हा अध्यक्ष, मैंद शहाजी सर , विष्णू काळे सर , कांबळे रंजनी मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी सर्व शिक्षक कर्मचारी यांनी घोषणा देऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर परिसर दुमदुमून सोडला होता.एकदिवशीय लाक्षणिक लक्षवेधी आंदोलन करण्यासाठी संजय सांबळे सर, सचिन दिवटे, व्यंकटी काळे सर , प्रकाश काळे सर, अरुण टकले,रमेश सलगर सर, दत्तात्रय टाकणकर सर, योगेश गायकवाड,समीर शेख ,पिसाळ दिनेश,आंवतकर जयराम, घडवे रमेश, शेळके हरिभाऊ, जोगदंड विठ्ठल,दिक्षीत वर्षा,लबडे वर्षा, म्हेत्रे ज्योती, ढोले मंजूषा,आगळावे राधा, खोडके मंजूषा, आचार्य गायत्री, विद्या तुरकमारे,जगतकर सुवर्णा,संगीता कुलकर्णी, काटे मनिषा,सपकाळ इंदू,कुसळे कल्पना, खैरे सुरेखा,इत्यादी शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

------------

### स्वखर्चाने विकासकामे,

कैलास ठोंबरे यांच्या निदर्शनास हि बाब काही ग्रामस्थांनी घालून हा रस्ता मोकळा करण्याची गरज असल्याचे सांगितले.ग्रांमपंचायतच्या ढिसाळ कारभारामुळे हा प्रश्न मार्गी लागत नसल्याने ठोंबरे यांनी स्वखर्चाने जेसीबीच्या साह्याने हा रस्ता दुरुस्त करत चारकाकी वाहन जाण्याईतपत रस्ता मोकळा केला.यामुळे येथून रहदारी करण्यासाठी गावकऱ्यांना शक्य होत असल्याने समाधान व्यक्त होत आहे.गावातील अनेक रस्त्यांवर पावसाळ्यात पाणी साचून झालेली बिकट परिस्थितीवर मुरुम टाकत रस्ते दुरुस्त करून माझे गाव सुंदर गाव हा संकल्प कैलास ठोंबरे जोपासत असल्याने गावातील ग्रामस्थ समाधान व्यक्त करीत आहेत.

------------

### देवगाव येथील शिक्षकांना

मोठे झालो . त्या परि आपलेही काही कर्तव्य आहेत त्या कर्तव्याशी पाठ न फिरवता. आपणही त्या समाजाचे काहीतरी देणे लागतो आणि म्हणून जेव्हा जेव्हा आपल्याला आपले कर्तव्य पार पाडायची संधी भेटते तेव्हा तेव्हा नक्कीच ती संधी घ्या आणि त्या समाजाप्रती आपली कर्तव्य पार पाडा. आणि समाजात काहीतरी नवीन पेरण्याचा प्रयत्न करा सध्या शिक्षकांच्या बदलीमुळे अनेक शाळांमध्ये हृदय पिळवटून टाकणारे क्षण घडत आहेत. लाडक्या गुरूजींच्या प्रेमापोटी निरागस चिमुकले अश्रूंनी रडताना दिसत आहेत. शिक्षण देणारा देव माणूस जेव्हा शाळा सोडून जातो, तेव्हा मुलांच्या हृदयात पोकळी निर्माण होते. हाच तर खरी शिक्षक विद्यार्थी नातीची गोडी आणि पवित्रता आहे.हे चित्र फक्त आणि फक्त जिल्हा परिषद शाळांत दिसून येते

------------

### जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे

चळवळीची माहिती व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्यात प्रत्येक जिल्ह्यामध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील युवक युवती करता सहकार बोर्डाच्या वतीने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम आलेल्या युवक युवती ना महाराष्ट्र राज्य सहकारी संघामार्फत माहे नोव्हेंबर २०२५ मध्ये आयोजित करावयाच्या राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धेत थेट प्रवेश दिला जाईल याची सर्व स्पर्धकांनी नोंद घ्यावी या स्पर्धेसाठी खालील विषय देण्यात आलेले आहेत त्यामध्ये १) सहकारी चळवळीतून ग्रामीण विकास २) सहकारातून रोजगार निर्मिती ३) सहकारी चळवळीत युवक युवतीचा सहभाग ४) सहकार व खाजगी क्षेत्र ५) सहकारातून नवभारताची निर्मिती ६) सहकारातून समृद्धी. हे सहा विषय यामध्ये दिलेले आहेत या स्पर्धेचे नियम स्पर्धेत सहभागी होण्याकरिता प्रत्येक स्पर्धकाकडून १०० रुपये प्रवेश फी आकारण्यात येईल स्पर्धेत सहभागी स्पर्धकातून प्रथम व द्वितीय क्रमांक काढला जाईल सहभागी प्रत्येक स्पर्धकाला ७+३=१० मिनिटे असा वेळ देण्यात येईल या स्पर्धेसाठी तज्ञ अभ्यासक यांची परीक्षक म्हणून निवड करण्यात येईल वरील अटीस अधीन राहून आपल्या जिल्ह्यातील जिल्हा उपनिबंधक व जिल्हा सहकार बोर्ड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयास आमंत्रित करून जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

---------

## पान १ वरून...

### अहवाल पाठवा शेतकऱ्यांना

राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.साईबाबांच्या दर्शनानंतर शाह, फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यासह सर्व मंत्री लोणीकडे रवाना झाले. प्रवरानगर येथील विखे पाटील साखर कारखान्याच्या विस्तारित कामाचे उद्घाटन तसेच लोणी येथे पद्मश्री विठ्ठलराव विखे आणि पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांचे अनावरण करण्यात आल्यानंतर लोणी बाजारतळ येथे अमित शाह यांच्या उपस्थितीत शेतकरी मेळावा पार पडला. यावेळी बोलताना शहा म्हणाले की महाराष्ट्रात शेतक-यांवर संकट आहे. ६० लाख हेक्टरवरील पिके उद्ध्वस्त झाली आहेत. ३१३२ कोटी राज्याला दिलेले आहेत, त्यातील काही रक्कम एप्रिलमध्ये दिली आहे. पंतप्रधान मोदींनी शेतक-यांना मदत देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. २२०० कोटींची मदत केली आहे असे शहा यांनी सांगितले.

------

### आष्टीत ३५ हजाराच्या

राजमाता हॉटेलच्या पाठीमागे आरोपी प्रकाश पाराजी खाडे यांच्याजवळ पाचशे रुपयांच्या बत्तीस हजार रुपये किमतीच्या बनावट नोटा मिळून आले प्रवीण अर्जुन क्षीरसागर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भारतीय चलनाच्या उभे होते बनावट मोठा ह्या खऱ्या असल्याचे वाचून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी चलनात आणणाऱ्या आरोपी प्रकाश खाडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास प्रभारी पोलिस अधिकारी भुतेकर हे करत आहेत.

------------

### ऊस उत्पादकाला मदतीची गरज

सक्तीची वसुली करणं चूक असल्याचंही शरद पवार म्हणाले. राज्यात अतिवृष्टी जी झाली त्यामुळं शेतकरी, पिकं यांचे अतोनात नुकसान झालं आहे. महाराष्ट्रात ऊस महत्त्वाचे पीक आहे.मराठवाड्यातील आणि पश्चिम महाराष्ट्रातील ऊसाचे मोठे नुकसान झालं आहे, असं शरद पवार म्हणाले. काही ठिकाणी पीक वाहून गेलं, काही ठिकाणी जमिनी वाहून गेल्या त्यात किती नुकसान झालं आहे, याचा आढावा घेण्याची गरज होती. महाराष्ट्र सरकार ने जास्त मदत केली पाहिजे अशी अपेक्षा आहे, असं पवार यांनी म्हटलं. आम्हाला सुद्धा आश्चर्य असं वाटलं की राज्य सरकारनं नुकसान ज्यांचं झालं त्यांना मदत करण्याच्या ऐवजी सगळ्या ऊस उत्पादकांकडून एक मोठी रक्कम मुख्यमंत्री निधीच्या साठी देण्याचा निर्णय त्यांनी घेतलेला आहे. ज्यावेळेला ऊस उत्पादकाला मदत द्यायला हवी त्यावेळी त्याच्याकडून सक्तीनं वसुली करणं हे अत्यंत चुकीचं आहे. ते मी मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालून त्यांनी या निर्णयाचा त्यांनी फेरविचार करावा, अशी आग्रहाची विनंती त्यांना करणार आहे, असं शरद पवार म्हणाले.देवेंद्र फडणवीस यांनी अहिल्यानगरमधील एका कार्यक्रमात म्हटलं की, आपण जर विचार केला, या ठिकाणी २०० कारखाने आहेत. फारतर २५ लाख एका कारखान्याला त्या ठिकाणी आपण बाजूला शेतकऱ्याकरता काढून द्यायला सांगितलं तुमच्या कारखान्यातील नफ्यातून २५ लाख रुपये जो शेतकरी तुमच्याकडे त्या ठिकाणी शेतमाल टाकतो, त्या शेतकऱ्यावर त्या ठिकाणी अशा प्रकारची आपत्ती आली आणि तुम्हाला पाच रुपये द्यायला सांगितले तरी देखील तुम्ही मागे पुढे पाहता, आता अशे काही कारखाने आम्ही शोधून काढले आहेत, ज्यांच्याकडे शेतकऱ्यांचा काटा मारलो जातो असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

---------

### मनोज जरांगे पाटील यांचा

अस्तित्व निर्माण केलं आहे, जर नादी लागला तर तुमचं नास होईल, राजकीय अस्तित्व उद्ध्वस्त होईल.'' या वक्तव्यातून त्यांनी मुंडे दांपत्याला सल्ला देत, पक्षीय आणि समाजिक जमीन टिकवण्याचे निर्देश दिले.

जीआर रद्दीकरणाविरुद्धचे आंदोलन ''बोगस आरक्षण खाणारे आता मराठ्यांना विरोधात''

जरांगे म्हणाले की, काही नेते व संघटना जीआर रद्द करण्यासाठी मोर्चा काढत आहेत आणि नावाखाली या चळवळींचा वापर केला जात आहे. ''दिल्लीचा लाल्या सांगतो मराठ्यांना टार्गेट करा,'' अशी टिप्पणी करत ते म्हणाले की धनगर, माळी व इतर काही जाती मराठ्यांच्या बाजूने आहेत आणि ''बोगस आरक्षण खाणारे'' आता मराठ्यांना विरोध करीत आहेत.

ते पुढे म्हणाले की, ''मराठ्यांना आरक्षणा विरोधात बोलणारा माणूस संपवावा लागणार आहे. मराठ्यांनो आपले थोडे काम केले म्हणून पाय चाटू नका.'' त्यांनी विरोध करणाऱ्यांना 'जागा दाखवावी' असे आवाहन केले.

**फडणवीसांना सल्ला, भुजबळवर टीका**

जरांगे यांनी देवेंद्र फडणवीसांना 'हुशार' म्हणून कौतुक केले आणि सांगितले की, फडणवीसांनी लक्ष ठेवावे कारण ''येवल्यावाला दुसऱ्यांना नेता होऊ देत नाही''. त्यांनी भुजबळवर आरोप करून म्हटले की, ''भुजबळ त्यांच्या अंगावर सोडत आहेत'' आणि भुजबळ यांनी कशाप्रकारे पक्षातील नेत्यांना एकत्र करून फडणवीस यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न सुरू केला आहे, असा आरोप केला.

**आरक्षणाचे भौगोलिक-ऐतिहासिक संदर्भ**

जरांगे यांनी १९९४ च्या त्या निर्णयाकडे लक्ष वेधले ज्यात काही जाती मध्ये समाविष्ट केल्या होत्या आणि त्यांनी त्या 'बोगस' समजून तातडीने त्या नोंदी रद्द करण्याची मागणी केली. ते म्हणाले की, मंडल आयोगाने मराठ्यांना १६% आरक्षण मान्य केले आहे आणि हा हक्क टिकवणे आवश्यक आहे.

**चेतावणीचा रंग राजकीय व सामाजिक परिणाम**

जरांगे यांनी स्पष्ट सांगितले की जर राजकीय नेते आणि लाभार्थी टोळींचे वाटाघाटी किंवा चुकीच्या नाद्या स्वीकारल्या गेल्या तर ''राजकीय अस्तित्व नास पडू शकते''. त्यांनी ५८ लाख नोंदींचा उल्लेख करून म्हटले की, ''उद्या अजून २ लाख येणार आहेत'', आणि या नोंदींच्या आधारे मराठ्यांच्या रोषाची ताकद वाढत असल्याचे अधोरेखित केले.

**निष्कर्ष आणि पुढील वाटचाल**

सरकारी व पक्षीय नेते या घोषणांवर कसे प्रतिसाद देतात हे आता पाहणे उरले आहे. मनोज जरांगे यांचे आव्हान, आरक्षण-संबंधी आवक-निर्यातींची पुन्हा तपासणी आणि संबंधित नेत्यांचे पावलोतरण हे आगामी दिवसांतील राजकीय चढउतार ठरणार आहेत. पंकजाधनंजय मुंडे यांच्याकडून किंवा भुजबळ आणि वडेट्टीवार यांच्या बाजूंनी यावर काय उत्तर येते ते पुढील घडामोडींवर अवलंबून राहील.

----------

### धीर सोडू नका, खचू नका; माजी मंत्री जयदत्त

गावकऱ्यांनी माजी मंत्री क्षीरसागर यांची भेट घेऊन याबाबतीत आपण लक्ष घालण्याची विनंती केल्यानंतर रात्र झालेली असताना देखील त्यांनी कपिलधार वाढीच्या ग्रामस्थांना धीर दिला. खचून जाऊ नका धीर सोडू नका असे सांगून याबाबतीत आपण प्रयत्न करत असल्याचे सांगून जमेल त्या पद्धतीने मदत करण्याचे आश्वासन गावकऱ्यांना दिल्यानंतर प्रत्येकाचा चेहरा खुलला होता. उपस्थित असलेल्या लहान लेकरांना आणि वृद्धांना बघून अक्षरशः डोळ्यात पाणी यावे अशी परिस्थिती आहे. यावेळी दिनकर कदम, चंद्रसेन नवले, विलास बडगे, अरुण डाके, नानासाहेब काकडे, सखाराम मस्के, ह.भ.प.हरिदास जोगदंड, अरुण बोंगाणे, शिवाजी भुरे, बाळू मिटकरी, अशोक राऊत, केशव शिंदे, अच्युत रसाळ यांच्यासह गावकरी उपस्थित होते.

-------------

### सहा कोटी मुलांसाठी आधार

केलेले हे अपडेट आता मोफत असतील. यापूर्वी, या वयोगटाबाहेर प्रत्येक एमबीयूसाठी १२५ रुपये शुल्क आकारले जात होते. नव्या निर्णयामुळे ५ ते १७ वर्षे वयोगटातील सर्व मुलांसाठी बायोमेट्रिक अपडेट पूर्णपणे मोफत झाले आहे.

--------------

### अनावश्यक एक्स-रेमुळे

नाही, तर अनावश्यक खर्च आणि धोकाही कमी होईल. एनएसएसआयचे माजी अध्यक्ष प्रो. एम. के. तिवारी यांनी सांगितले की, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातही मानवी कौशल्याची बरोबरी कोणी करू शकत नाही. एआय आपल्याला दिशा दाखवू शकते, पण रुग्णाची स्थिती समजून योग्य तपासणीची निवड प्रशिक्षित सर्जनच करू शकतात.

---------------

### देशभरातील बँकांमध्ये १.८४ लाख

हे शोधण्यास मदत करणे. तसेच सुलभतेसाठी दावा न केलेल्या रकमेपर्यंत पोहोच सुलभ करण्यासाठी डिजिटल साधनांचा वापर करणे. अर्थमंत्री सीतारमण यांनी नागरिकांना लहान गरजांकडेही दुर्लक्ष न करण्याचे आवाहन केले आहे. दाव्यांची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी सरकारने डिजिटल पोर्टल्सचा वापर सुरू केला आहे.यूडीजीएएम : भारतीय रिझर्व्ह बँकेचे यूडीजीएएम (अनक्लेम्ड डिपॉझिट गेटवे टू ॲक्सेस इन्फॉर्मेशन) पोर्टल नागरिकांना दावा न केलेली रक्कम शोधण्यास मदत करते. नागरिकांनी योग्य ती कागदपत्रे घेऊन जवळच्या बँका किंवा संबंधित संस्थांकडे जावे. वित्तमंत्र्यांनी सल्ला दिला आहे की, तुम्ही एकदा दावा दाखल करताच, तुम्हाला तुमचा पैसा मिळतो.

----------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. ०६ ऑक्टोबर २०२५



## थोडक्यात...



### मोगरा पुरगस्तांना ग्रामस्थांसह मित्रपरिवाराचा मदतीचा हात

माजलगाव । प्रतिनिधी

यावर्षी धुव्वांधार व मुसळधारपावसामुळे गोदावरी व सिंदफण नदीला महापूर आल्यामुळे अनेक गावातील घरांचे, शेतीचे, मंदिराचे प्रचंड नुकसान झाले. त्याचप्रमाणे मोगरा गावातही पुराचे पाणी घुसल्याने नुकसान झाले आहे. त्या गरजु पुरग्रस्तांना मोगरा गावातील काही ग्रामस्थांच्या व मित्रपरिवाराच्या वतीने जिवनावश्यक वस्तुंचे किट देउन मदतीचा हात दिला आहे. तालुक्यातील मोगरा येथे गोदावरी नदीला पुर आल्याने गावाला वेढा पडला होता. परिणामी शाळेच्या इमारतीत, मंदिरात, घरांमध्ये पाणी घुसल्याने जनजिवन विस्कळीत झाले आहे. सर्वत्र चिखलमय परिसर झाल्याने अनेकांचे नुकसान देखिल झाले आहे. त्या गरजु पुरग्रस्तांना दि. ४ ऑक्टोबर शनिवारी रोजी सकाळी ९.०० वाजता मोगरा येथे किराणा किटचे वाटप करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक तालुका संघचालक जगदीश साखरे, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, प्रा. कमलकिशोर लड्डा, प्रा. अशोक काळे, उपप्राचार्य युवराज मुळये, डॉ. किशोर रत्नपारखी, गिन्यानदेव राठोड, संदिप सावंत, तुकाराम भोजणे, अमित धुमाळ, ग्रामसेवक श्री. टकले, श्रीहरी शिंदे, शिवाजी वाकळे यांचेसह अनेकांची उपस्थिती होती.

### लिंगायत वधू –वर परिचय मेळाव्याला चांगला प्रतिसाद



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पालकांनी सामोपचाराने आपल्या पाल्यांची विवाह जुळवावेत , असे अवाहन शंभूलिंग शिवाचार्य महाराज यांनी केले.

येथील वीरशैव लिंगायत वधु –वर सूचक पालक मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते . कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठनेते नंदकिशोर मुंदडा , माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी , परळीचे माजी नगराध्यक्ष सोमनाथअप्पा हालगे , लक्ष्मणअप्पा शेटे, राजेंद्र मुंडे , संजय गंभीरे, डिगे साहेब यांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले . यावेळी नंदकिशोर मुंदडा, राजकिशोर मोदी, सोमनाथ अप्पा हालगे यांची भाषणे झाली. त्यानंतर वधू –वर व पालकांनी परिचय करून दिला .

सुरुवातीला शिवकुमार निर्मळे यांनी प्रास्ताविक केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनिता पंचाक्षरी, कमल राऊत आणि मनिषा ढेले यांनी केले.पाहुण्यांचे स्वागत बाळासाहेब राऊत , बसलिंगअप्पा हरंगुळे, प्रदीप ढेले , माणिक बुरांडे , विनोद पोखरकर , गणेश टुरके यांनी केले .शेवटी संयोजक विजयकुमार चलवदे पांनी सर्वांचे आभार मानले . यावेळी तीनशे पालकांनी नाव नोंदणी केली होती .

## जिल्ह्यात ९०७ मिलिमीटर पाऊस

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये एकूण ९०७.५मिलिमीटर पाऊस पडला असून सरासरीच्या १६०.३ टक्के पाऊस पडला आहे .बीड तालुक्यात १०६.४ मि.मी, पाटोदा-९७४.५ मि.मी., आष्टी-६९०.४ मिमी, गेवराई-९०७.५ मिमी, माजलगाव-९४६.३ मि.मी., अंबाजोगाई ९५४.७ मि.मी., केज-८८९.८ मि.मी., परळी वै.८५५.२ मि.मी., धारूर-१०३०.९ मि.मी., वडवणी-७३७.७ मि.मी, शिरूर कासार-९३९ मिमी असा एकुण जिल्ह्यामध्ये ९०७.५ मि.मी.पाऊस झाला. मागील सरासरीनुसार हा पाऊस १६०.३ टक्के एवढा असून गेल्या २४ तासांमध्ये ३.४ मिमी एवढा पाऊस पडला

# धम्मचक्र प्रवर्तन दिन हा मानवमुक्तीचा लढा - डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील महात्मा फुले स्मारक समिती तर्फे धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला.

यावेळी विचारमंचावर स्मारक समितीचे अध्यक्ष सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, प्रमुख व्याख्याते म्हणून पाली इतिहास संशोधक प्रा.डॉ.कीर्तीराज लोणारे, कार्यकारी अध्यक्ष प्रा.बी.के.मसने, उपाध्यक्ष प्रा.डॉ.अनिल नरसिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहणाने झाली. यावेळी महापुरूषांच्या प्रतिमांचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा.डॉ.किरण चक्रे यांनी भारताचा इतिहास स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये आणि स्वातंत्र्योत्तर काळामध्ये कशा बदलत गेला आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची राष्ट्रनिर्माते म्हणून भूमिका यावर विवेचन करीत महापुरूषांच्या विचारांचा वारसा जोपासण्याचे काम महात्मा फुले स्मारक समिती करीत आहे असे प्रतिपादन केले. तर प्रा.बी.के.मसने यांनी



संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे बहुजन समाजाला न्याय मिळाला आहे सामाजिक प्रवाहामध्ये स्थान मिळालेले आहे त्यामुळे साळी, माळी, कोळी, तेली, तांबोळी यांनी संविधान निर्मात्याचे उपकार मानायला हवे अशा शब्दांत परखड मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याता प्रा.कीर्तीराज लोणारे यांनी तथागत गौतम बुद्ध यांच्या काळात मानवतेचे मूल्य जपणाऱ्या, माणसांमध्ये प्रेम वृद्धिंगत करणाऱ्या,जाती, धर्म, लिंग, भेद याला कसलेही स्थान न देणाऱ्या बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार संपूर्ण जगामध्ये कसा झाला. तथागत गौतम बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर सम्राट अशोकाच्या काळामध्ये बौद्ध धम्माला राजाश्रय मिळाला. कलिंग युद्धानंतर झालेल्या विनाशा नंतर सम्राट अशोकाला शांतीचे महत्त्व कळाले, तथागत गौतम बुद्धांच्या विचारांचे महत्त्व कळाले आणि जगाला युद्ध नाही तर बुद्ध हवा या प्रेरणेने सम्राट अशोकाने जगभरामध्ये बौद्ध धम्माचा प्रचार प्रसार केला. सम्राट अशोकानंतर अनेक राजकीय उलथापालथी अनेक परकीय आक्रमणे यामध्येही बौद्ध धम्म आपले अस्तित्व टिकवून ठेवले.याचे कारण सम्राट अशोकाने जी शिलालेखे जी बौद्ध मंदिरे बौद्ध स्तूप गुहालेखे याद्वारे बौद्ध धम्माचे विचार दगडांवर कोरून ठेवले त्यामुळे बौद्ध धम्म भारतामध्ये टिकून राहिला. त्यानंतर सर्वात मोठी क्रांती डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ साली नागपूर येथे आपल्या पाच लाख अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन केली. यावेळी बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अनुयायांना प्रत्येक गोष्टीची चिकित्सा केली पाहिजे आणि चिकित्सेनंतरच ती गोष्ट स्वीकारली पाहिजे असे सांगत मला तथागत गौतम बुद्ध व बौद्ध धम्माची शिकवण पटलेली आहे त्यामुळे मी बौद्ध धम्म स्वीकारत आहे. तुम्हालाही चिकित्सा करून जर हा धम्म पटत असेल तरच तुम्ही या धम्मामध्ये या असे भावनिक आवाहन केले होते. प्रा.कीर्तीराज लोणारे यांनी हा संपूर्ण इतिहास आपल्या सोप्या भाषेमध्ये अत्यंत मार्मिक आणि प्रभावीपणे मांडत श्रोत्यांची मने जिंकली. अध्यक्षीय समारोप करताना डॉ.राजेश इंगोले यांनी आपल्या रसपूर्ण शैलीत तथागत गौतम बुद्ध, सम्राट अशोक, संत तुकाराम महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, गाडगे महाराज, तुकडोजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे स्वातंत्र्य समता, बंधुता आणी न्याय ही मानवी मूल्य जोपासणारे विचारांची माळ आहे भारतीय इतिहासात या सर्वांचा नाम उल्लेख झाल्याशिवाय ही कडी पूर्ण होऊ शकत नाही असे गौरवोदगार काढले. डॉ.इंगोले यांनी स्वातंत्र्यपूर्व भारत, स्वातंत्र्यानंतरचा भारत, डॉ.आंबेडकरांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेण्याआधीचा समाज आणि दीक्षा घेतल्यानंतरचा समाज अशी मांडणी करत यावर सविस्तर विश्लेषण केले. आपल्या मार्मिक प्रभावी भाषणामध्ये त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाकडून काय अपेक्षा केली होती आणि समाज नेमके काय करतो आहे यावर भाष्य केले. बौद्ध धम्माची दीक्षा घेतल्यानंतरचा समाज हा जबाबदार असायला हवा होता.

## जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपीने जागतिक हृदय दिन प्रेरणादायी पोस्टर स्पर्धेने साजरा



माजलगाव । प्रतिनिधी


जागतिक हृदय दिन सेलिब्रेशनमध्ये, जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपीने ''डोन्ट मिस अ बीट'' या थीमवर आधारित पोस्टर स्पर्धेचे आयोजन केले होते, ज्यामध्ये ''हेल्दी बीट,हेल्दी लाईफ'' या विषयावर प्रकाश टाकण्यात आला. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थी आणि समाजात हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्याच्या महत्त्वाविषयी जागरूकता पसरवणे हा होता.

या स्पर्धेत सुमारे २० विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला,ज्यांनी निरोगी भविष्यासाठी हृदय आरोग्य, प्रतिबंधात्मक काळजी आणि जीवनशैलीतील बदलांवर जोर देणारी नाविन्यपूर्ण आणि माहितीपूर्ण पोस्टर्स सादर केली. विद्यार्थ्यांच्या कामातील सर्जनशीलता आणि स्पष्टतेचे पर्यवेक्षक आणि प्रेक्षक दोघांकडूनही खूप कौतुक झाले. पोस्टरचे मूल्यमापन प्रवीण कुमार आणि श्रीमती शितल मॅडम यांनी केले, ज्यांनी विद्यार्थ्यांच्या समर्पण, जागरूकता आणि सादरीकरण कौशल्याबद्दल त्यांची प्रशंसा व कौशल्यांचे कौतुक केले.स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे असुन यामध्ये पहिले बक्षीस: कु. पूनम मुंडे,दुसरे बक्षीस:कु.ऐश्वर्या लवटे आणि कु. वेदांती सोनवणे,तिसरे बक्षीस: कु.प्रतीक्षा खाडे आणि कु. मोनू राठोड बक्षीस वितरण समारंभ जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचे प्राचार्य डॉ.के. आनंद बाबू यांच्या उपस्थितीत पार पडला,सोबत वाघ (कार्यालयीन अधीक्षक), शिंदे, इरफान पठाण, आणि प्राध्यापक सदस्य उपस्थित होते.त्यांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांना खूप प्रोत्साहन मिळाले. या कार्यक्रमाचे समन्वय आणि आयोजन कॉलेजमधील प्राध्यापक डॉ.एम. पॉलराज यांनी केले होते,ज्यांनी कार्यक्रमाची सुरळीत अंमलबजावणी सुनिश्चित केली. या उपक्रमाने केवळ विद्यार्थ्यांच्या सर्जनशील प्रतिभांनाच नव्हे तर जागतिक हृदय दिनाच्या वैश्विक भावनेशी जुळवून घेत,हृदय आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ म्हणूनही काम केले.

## नागरिकांनो, तणावमुक्त जीवन जगा - डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**हल्ली ताणतणावयुक्त जीवनशैलीमुळे हृदयविकार होण्याची शक्यता वाढत आहे. हृदय हा शरीरातील सर्वात अनमोल अवयव आहे, त्याला क्षणाक्षणाला जपा, तणाव मुक्त, व्यसनमुक्त जीवन जगा.**



धकाधकी व स्पर्धेच्या युगात आपले अस्तित्व जपताना विशीच्या आत हार्ट फेल होण्याचे प्रमाण वाढत आहे. शरीराला झेपेल असा व्यायाम करा, पायी चला, सायकल चालवा किंवा धावण्याची कसरतही तुमचे हृदय तंदुरुस्त ठेवेल, असा सल्ला तज्ज्ञ डॉक्टरांनी दिला.

संशोधनानुसार नियमित सायकलिंगमुळे हृदयविकाराचा धोका ५० टक्के पर्यंत कमी होऊ शकतो. ताण कमी होतो . सायकल चालवताना ताण-तणावाचे हार्मोन्स कमी होतात, ज्याचा हृदयावर चांगला परिणाम होतो. दीर्घायुष्य लाभते नियमित सायकलिंग करणाऱ्यांचा विश्रांतीतील हृदयाचा ठोका कमी असतो व हृदय अधिक मजबूत बनते

अशी घ्यावी काळजी✻ सायकलिंग हे हृदयाच्या आरोग्यासाठी सर्वोत्तम (कार्डिओ) व्यायामांपैकी एक आहे.मध्यम गतीने सायकल चालवल्यास उच्च रक्तदाब नियंत्रणात येतो व पक्षाघात/हृदयविकाराचा धोका कमी होतो. वाईट कोलेस्टेरॉल कमी व चांगले कोलेस्टेरॉल वाढते त्यामुळे रक्तवाहिन्या स्वच्छ राहतात व अडथळे कमी होतात. वजन नियंत्रणात राहते कॅलरीज जळतात व हृदयावरील भार कमी होतो. हृदयविकाराचा धोका कमी होतो.

सर्वांनीं तणावरहित जीवन जगावे

अपयश आले तरी खचून न जागा ताणतणवापासून दूर रहा, हृदय तंदुरुस्त राखण्यासाठी शरीराची हालचाल सुरू ठेवणे गरजेचे आहे. जन्मजात हृदयात दोष असलेल्यांना हृदयविकाराचा धोका असला तरी वरून ठणठणीत वाटणारे अटॅकचा शिकार होत आहेत.असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले.

## डॉ.आयान मतीन खतीब बीएएमएस यशस्वी उत्तीर्ण; गावकऱ्यांच्या वतीने सत्कार सोहळा

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा गावचे भूमिपुत्र मतीन खतीब यांचे जेष्ठ चिरंजीव आयान खतीब यांनी पहिलीपासून ते दहावी पर्यंतचे शिक्षण तलवाडा जिल्हा परिषद शाळेत घेतले. त्यानंतर बारावीचे शिक्षण माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय तलवाडा येथे घेऊन पुढील नीट परिक्षेची तयारी करण्यासाठी त्यांनी लातूर येथे क्लास लावली व नीट परीक्षेत चांगले गुण घेऊन बीएएमएस साठी त्यांची राजीव गांधी युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्स बालकोट कर्नाटक राज्यामध्ये क्रमांक लागला. त्यांचे आई वडील, मतीन खतीब, व माजी उपसरपंच मोबीन खतीब, गोस पासा खतीब यांची आयन यांनी डॉक्टर बनावं हे चोघांचाही स्वप्न होतं. शेवटी आयन यांनी त्यांच्या आई वडिलांचं आणि काकांचं स्वप्न उराशी बाळगून अथक परिश्रम घेतले. आपण आपल्या बापाच्या परिश्रमाचे संधीचे सोन करण्यासाठी डॉक्टर आयान खतीब यांनी पुरेपूर अभ्यास केला व आपले आई-वडिलांचे स्वप्न साकार केले .



त्यांची लहाणी बहीण बी फार्मसी सध्या माजलगाव येथे करत आहे. विजया महानतेशं मेडिकल कॉलेज मधुन डॉ.आयान खतीब यांनी इ-चड पदवी प्रथम श्रेणी प्राप्त करून राजीव गांधी युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्स, बागलकोट, कर्नाटक मधे प्रथम क्रमांक मिळवला. डॉ आयन मतीन खतीब यांच्या या यशाबद्दल हमजा प्रतिष्ठान, व गावकऱ्यांच्या वतीने सत्कार सोहळा संपन्न झाला. तलवाडा परिसरातून सर्वत्र आनंद आणि कौतुक व्यक्त होताना दिसत आहे. आयन च्या यशा बद्दल सत्कार करतांना मुफ्ती तालेब, मोलाना जाकेर सिद्दिकी, मोलाना हानिफ, मुबीन खतीब, खदिर तबोली, मा. प.स.सदस्य शामसुंदर कुंड, मोलाना इर्शाद कुरेशी,मोलाना तोहित,पत्रकार अल्ताफ कुरैशी, नवनाथ पवार सर ,अभिजित थोरात, इरफान कुरेशी, शोरफ पठाण, मुजमिल शहा, नय्युम बागवान,आमु शेख,खदीर पठाण, पत्रकार आर आर बहिर,आपसर शेख, मैनुद्दीन बागवान, सुनिल तुरुमारे, शहेनशहा शाहा,परवेज बागवान, राजाभाऊ राऊत, हुजेफ खतीब,अनस तांबोळी, हमजा खतीब,शेख खैसर,सह मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होता

## श्री क्षेत्र लोहगाव ग्रामस्थांच्यावतीने शिरूर कासार शहरातील पूरग्रस्त कुटुंबाला मदत

शिरूर कासार । प्रतिनिधी

श्री क्षेत्र लोहगाव पुणे ग्रामस्थांच्यावतीने शिरूर कासार शहरातील पूरग्रस्त कुटुंबाला किराणा किटचे वाटप शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब भाई शेख यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर शहराचे युवक आनंद शेठ चोरडिया यांच्या पुढाकाराने सामाजिक बांधिलकी जोपासत निस्वार्थपणे पूरग्रस्त कुटुंबाला किराणा किट वाटप करण्यात आल्या.






मेहबूब भाई शेख यांच्या मार्गदर्शनाखाली आनंद शेठ चोरडिया यांनी पुढाकार घेऊन पुणे येथील श्रीक्षेत्र लोहगाव ग्रामस्थ श्री. काळूराम जयवंत साठे, श्री.बाळासाहेब उर्फ सोमनाथ खांडवे, श्री.उमेश खांदवे, श्री.विलास आप्पा खांदवे, श्री.काळे नाना, श्री.बापू गरुड व समस्त ग्रामस्थ यांना विनंती केली त्यांच्या विनंतीला मान देत शिरूर शहरातील पूरग्रस्त कुटुंबाला किराणा किटची मदत करण्यात आली.

## आम्ही कराडकर यांचा पूरग्रस्त पाटोदेकरांना मदतीचा हात



**पाटोदा । प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे पाटोदा परिसरातील अनेक कुटुंबांचे संसार उघड्यावर आले, शेतीतील पिकांचे नुकसान झाले, घरातील अन्नधान्य, वस्तू वाहून गेल्या. या संकटाच्या काळात आम्ही कराडकर चक-५० यांच्या वतीने व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पाटोदा यांच्या माध्यमातून पूरग्रस्त बांधवांना दिलासा देणारा मोठा मदत उपक्रम हाती घेण्यात आला.या उपक्रमांतर्गत पूरग्रस्त कुटुंबांना किराणा किट, भांडीसाहित्यासह संसार उपयोगी साहित्य, तसेच शालेय विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, वह्या, पेन, पेन्सिल आणि शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. मदतीचा लाभ खऱ्या गरजूंना मिळावा यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पाटोदा टीमने सुनियोजनबद्ध नियोजन करून प्रत्यक्ष पूरग्रस्त भागात जाऊन मदत पोहोचवली.

कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने करण्यात आले. पूरग्रस्त कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला, कारण त्यांच्या रोजच्या गरजांसाठी आवश्यक वस्तू वेळेवर उपलब्ध झाल्या. या प्रसंगी आम्ही कराडकर प्रतिनिधींनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सेवा भावाचे कौतुक करत सांगितले की,संघाच्या स्वयंसेवकांनी केवळ मदत वाटपच नाही तर पूरग्रस्तांच्या समस्या ऐकून त्यांना दिलासा देण्याचे कार्य केले. अशा संघटित प्रयत्नांमुळेच समाजात मानवतेचा संदेश पोहोचतो.या मदतकार्यादरम्यान राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पाटोदा यांचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यांनी पूरग्रस्तांच्या घरापर्यंत जाऊन त्यांची परिस्थिती पाहिली व आवश्यक मदत पोहोचवली.पूरग्रस्त नागरिकांनी भावनिक शब्दात सांगितले की,आम्ही कराडकर व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पाटोदा यांच्या या मदतीमुळे आम्हाला जगण्याची नवी उमेद मिळाली. अशा संवेदनशील लोकांमुळेच समाजात आशेचा किरण दिसतो.कार्यक्रमानंतर परिसरात आम्ही कराडकर यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक होत आहे. संकटाच्या काळात अशा पद्धतीची संघटित आणि मनापासूनची मदत कार्यवाही ही संपूर्ण तालुक्यासाठी प्रेरणादायी ठरली आहे.

## अंबाजोगाई अभियांत्रिकी महाविद्यालयात हॅकेथॉनचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील एम.बी.ई.एस.कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अंतर्गत शनिवार, दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी हॅकेथॉन आयोजित करण्यात आले होते.

या उपक्रमांतर्गत जो प्रतिष्ठित स्मार्ट इंडिया हॅकेथॉन (एसआयएच) २०२६ साठी एक महत्त्वाची प्राथमिक फेरी म्हणून काम करेल. जो स्थानिक प्रतिभेची ओळख पटविण्यासाठी आणि त्यांचे पालन पोषण करण्यासाठी तसेच आयोजित केलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थी वास्तविक जगातील समस्यांसाठी नाविन्यपूर्ण उपाय विकसित करण्यासाठी स्पर्धा करतील. अंतर्गत हॅकेथॉनचे उद्दिष्ट राष्ट्रीयस्तरांवर महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी सर्वांत आशादायक संघ निवडणे हे आहे. यात सहभागींना शाश्वत विकास, स्मार्ट शिक्षण, आरोग्यसेवा आणि ग्रामीण सक्षमीकरण यासह परंतु, त्यापुरते मर्यादित नसलेल्या एसआयएच थीम अंतर्गत येणाऱ्या विविध आव्हानांना तोंड देणारे हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर प्रोटोटाइप तयार करण्याचे काम सोपविले जाणार आहे.



याबाबत बोलताना डॉ.बसवराज आलूरकर (एसपीओसी) यांनी सांगितले की, आमच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांची सर्जनशीलता आणि तांत्रिक कौशल्ये प्रदर्शित करण्याची ही एक उत्तम संधी आहे, तर यावेळी बोलताना एम.बी.ई.एस.कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे कार्यवाह प्राचार्य डॉ.एन.ए.रावबावळे म्हणाले की, स्मार्ट इंडिया हॅकेथॉन हे एक अत्यंत स्पर्धात्मक व्यासपीठ आहे. आणि या अंतर्गत फेरीमुळे आम्हाला पुढील आव्हानांसाठी आमचे सर्वोत्तम आणि तेजस्वी नेतृत्व, मनुष्यबळ तयार करण्यास मदत होईल. आम्हाला विश्वास आहे की, या माध्यमातून आमचे विद्यार्थी खरोखरच काही अभूतपूर्व कल्पना घेऊन येतील असे कार्यवाह प्राचार्य डॉ.रावबावळे यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे मूल्यांकन अनुभवी प्राध्यापक आणि प्राचार्य पॅनेलद्वारे करण्यात आले. विजेत्या संघांना केवळ एसआयएच-२०२६ मध्ये महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करण्याची संधीच मिळणार नाही तर त्यांचे प्रकल्प अधिक विकसित करण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन आणि संसाधने देखील मिळणार आहेत. हॅकेथॉन आज शनिवार, दिनांक २७ सप्टेंबर रोजी एम.बी.ई.एस.कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कॅम्पस मध्ये होत आहे. या माध्यमातून महाविद्यालयीन समुदायाला सहभागी होण्यासाठी आणि नवोपक्रमाच्या या रोमांचक प्रवासात सहभागी होण्यासाठी पाठिंबा देण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे हे विशेष बाब आहे. अंतर्गत हॅकेथॉनच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी, सर्व विभागप्रमुख डॉ.विवेकानंद राजमान्य, डॉ.व्हि.व्हि.येरिगेरी, प्रा.एस. ए.बिराजदार, प्रा.एस.व्ही.कुलकर्णी, डॉ.एस.व्हि.येरिगेरी यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. हॅकेथॉन (ज्याला हॅक डे, हॅकफेस्ट, डेटाथॉन किंवा कोडफेस्ट असेही म्हणतात ; हॅकिंग आणि मॅरेथॉनचा एक पोर्टमँटो) हा एक कार्यक्रम आहे. जिथे लोक २४ किंवा ४८ तासांसारख्या तुलनेने कमी कालावधीत जलद आणि सहयोगी अभियांत्रिकी मध्ये गुंततात. ते बहुतेकदा स्प्रिंट - सदृश डिझाइन सारख्या चपळ सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट पद्धती वापरून चालविले जातात जिथे संगणक प्रोग्रामर आणि सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटमध्ये गुंतलेले इतर लोक, ज्यात ग्राफिक डिझायनर्स, इंटरफेस डिझायनर्स, उत्पादन व्यवस्थापक, डोमेन तज्ज्ञ आणि इतर सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग सारख्या अभियांत्रिकी प्रकल्पांवर सखोलपणे सहयोग करतात. हॅकेथॉनचे उद्दिष्ट कार्यक्रमाच्या अखेरीस कार्यरत सॉफ्टवेअर किंवा हार्डवेअर तयार करणे हे असते. हॅकेथॉन मध्ये विशिष्ट लक्ष केंद्रित केले जाते, ज्यामध्ये वापरलेली प्रोग्रामिंग भाषा, ऑपरेटिंग सिस्टम, ॲप्लिकेशन, एपीआय किंवा प्रोग्रामरचा विषय आणि लोकसंख्याशास्त्रीय गट यांचा समावेश असू शकतो. इतर प्रकरणांमध्ये, तयार केल्या जाणाऱ्या सॉफ्टवेअरच्या प्रकारावर किंवा नवीन सिस्टमच्या डिझाइनवर कोणतेही बंधन नाही. कार्यात्मक सॉफ्टवेअर किंवा हार्डवेअर तयार करण्याव्यतिरिक्त, हॅकेथॉन सहभागींना समस्या सोडविणे, गंभीर विचारसरणी, सर्जनशीलता, टीमवर्क, संवाद आणि वेळ व्यवस्थापन यासारखी कौशल्ये विकसित करण्यास मदत करू शकतात. हॅकेथॉन नवीन कंपन्या स्थापन करण्यास, वास्तविक जगातील समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय शोधण्यास किंवा विशिष्ट तंत्रज्ञान किंवा कारणांभोवती समुदाय तयार करण्यास देखील कारणीभूत व सहाय्यभूत ठरू शकतात हे उल्लेखनीय आहे.

## राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाचा समारोप

### महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री पुण्यतिथी साजरी

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात आज राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती व लालबहादूर शास्त्री यांची पुण्यतिथी व साजरी करण्यात आली याचबरोबर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर रोजी आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त कार्यक्रम आयोजन करण्यात आले या सप्ताचा समारोप समारंभ अस संपन्न झाला या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राचार्य विश्वासरावजी कदम त्याचबरोबर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक लोखंडे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक बापू घोक्षे व्यासपीठावर उपस्थित होते सर्वप्रथम महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेची पूजन करून अभिवादन करण्यात आले मान्यवरांचा सत्कार करण्यात आला यानंतर या कार्यक्रमाची प्रस्ताविक प्राध्यापक लोखंडे यांनी केले त्यांनी आपल्या मनोगतात राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमाचे रूपरेषा विशद केली या सप्ताह माध्यमातून विविध कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. यानंतर प्राध्यापक घाडगे सर प्राचार्य कदम सर यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे आभार प्राध्यापक बापू घोक्षे यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिल शिंदे श्री दत्ता चादर यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक उपस्थित होते कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.




cmyk

# शेतीत एआय तंत्रज्ञानाच्या वापराशिवाय संकटावर मात करता येणार नाही

## नितीन गडकरींचं वक्तव्य, म्हणाले, शेतकरी इंधन दाता झाला पाहिजे

शेतकरी हा इंधन दाता झाला पाहिजे असे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले. नेते येतात फोकनाड्या मारतात आणि निघून जातात. पण मी त्यापैकी नाही असे गडकरी म्हणाले. वर्ध्यातील सेलू येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते. पालकमंत्री पंकज भोयर, माजी खासदार रामदास तडस, सुरेश वाघमारे उपस्थित होते. शेतीत एआय तंत्रज्ञानाचा उपयोगाशिवाय संकटावर मात करता येणार नाही असे गडकरी म्हणाले. वर्ध्याच्या सेलू येथे मानस ऍग्रो कंपनीकडून शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा सल्ला दिला. आपल्या गावात शेतकऱ्यांकडे पैसे नसल्याने आपण शेतकऱ्यांची जमीन बटाईने करीत असल्याचे सांगितले. गडकरी यांनी शेतकरी हा इंधन दाता झाला पाहिजे असे म्हणाले.

माझा ड्रोन आला, माझ्याकडे इलेक्ट्रिक ट्रॅक्टर आहे. मी माझ्या गावाच्या दोन दोन तीन तीन



एकराच्या शेतकऱ्यांची जमीन बटाईने घेतल्याचे गडकरी म्हणाले. त्यांच्याकडे पैसेच नाहीत. बियाणे नाहीत. खतं नाहीत. श्रीहरी बापू महाराज धापेवाड्याचे आहे. त्यांची पस्तीस एकर जमीन मी बटाईने घेतली आहे. माझ्याकडील इलेक्ट्रिक ट्रॅक्टरने पस्तीस एकर जमीन वखरणी झाली, खर्च शून्य लागला. ड्रोनने स्प्रेइंग सुरू आहे. ड्रोन देखील इलेक्ट्रीकवर आहे. म्हणजे येणाऱ्या काळात कलमापासून, बिजापासून, तर स्प्रेइंग पर्यत आपल्याला एआय तंत्रज्ञानांचा उपयोग केल्याशिवाय आपण संकटावर मात करू शकत नाही असे गडकरी म्हणाले.मी जेव्हा मक्यापासून इथेनॉल करण्याचा विषय मांडला तेव्हा खुप लोकांनी विरोध केला. सरकारची धोरण महत्वाची आहेत. मी जेव्हा मक्यापासून इथेनॉल करण्याचा विषय मांडला तेव्हा खुप लोकांनी विरोध केला. पेट्रोलियममुळे २२ लाख कोटी रुपये देशाच्या बाहेर जातात. तो इम्पोर्ट बंद करण्याच्यासाठी आम्ही संघर्ष करतो. पेट्रोलियम लॉबी माझ्याही मागे लागली. मी इथेनॉल तयार करीत नाही असा खोटा प्रचार केला. पण मी कधी डळमळलो नाही. आपला शेतकरी केवळ अन्नदाता नाही तर इंधन दाता झाला पाहिजे असे गडकरी म्हणाले. शेतकरी इंधन दाता नाही तर ऊर्जा दाता झाला पाहिजे, ऊर्जा दाता नाही तर डांबर दाता झाला पाहिजे, डांबर दाता नाही तर हायड्रोजन दाता झाला पाहिजे, हायड्रोजन दाता नाही तर हवाई इंधन तयार करणारा झाला पाहिजे असे गडकरी म्हणाले.

# शेळ्यांसोबत कुक्कुटपालन शेतकऱ्यांच्या फायद्याचे



पशुपालन हा उत्तम जोडव्यवसाय आहे. पण काही जोडव्यवसाय एकमेकांना पूरक सुद्धा असतात. हे व्यवसाय एकत्रित केल्यावर शेतकऱ्यांना फायदा होऊन त्यांचे उत्पन्न सुद्धा वाढते. असाच एक पशुपालनातील पूरक व्यवसाय आहे शेळी-कुक्कुटपालन.

शेतकऱ्यांनी शेळ्यांसोबत कोंबडी पाळल्यास त्यांचा खर्च कमी होतो आणि नफा वाढतो. शेळ्यांसोबत कोंबडी पाळल्याने खर्च निम्म्यावर येतो आणि अंडी आणि कोंबडीचे मांस सुद्धा मिळते. अशा प्रकारे पशुपालक कमी खर्चात चांगला नफा मिळवू शकतात. शेळीपालन ग्रामीण अर्थव्यवस्थेत विशेष महत्त्वाचे आहे, कारण ते अनेक लोकांसाठी कमाईचे मुख्य साधन आहे. परंतु शेतकऱ्यांनी शेळ्यांसोबत कोंबडी पाळल्यास त्यांचा खर्च कमी होऊन नफाही वाढतो. देशभरातील अनेक शेतकरी अजूनही गायी, म्हशी आणि शेळ्यांसोबत कोंबडी पाळत आहेत. शेळ्यांसोबत कोंबडी पाळल्याने खर्च निम्म्यावर येतो. अशा प्रकारे पशुपालक कमी खर्चात चांगला नफा मिळवू शकतात. शेळीचे शेण आणि कोंबडीची विष्ठा वापरून शेतकरी सेंद्रिय खत निर्माण करू शकतात.

कोंबड्या आणि शेळ्यांचे एकत्र पालन : एकत्र कुक्कुटपालन आणि शेळीपालनासाठी, सर्वप्रथम एक विशेष प्रकारचे शेड तयार करावे लागेल ज्यामध्ये कोंबड्या आणि शेळ्या एकत्र राहू शकतील. या शेडचे दोन भाग करण्यासाठी मधोमध लोखंडी जाळी लावून कोंबड्यांना बाहेर येण्यासाठी छोटा दरवाजा करावा. शेळ्यांना चरण्यासाठी बाहेर घेऊन शेडमध्ये साफसफाईसाठी जाताना जाळीत बसवलेले छोटे गेट उघडले पाहिजे. गेट उघडल्यानंतर कोंबड्या शेळ्यांच्या जागी येतात. शेळ्यांच्या शेडमध्ये उरलेला चारा कोंबड्या मोठ्या उत्साहाने खातात.

कोंबडीच्या खाद्याच्या किमतीत कपात : शेळ्यांना बरसीम, कडुनिंब, सायकमोर, जामुन आणि पेरू यांसारखा हिरवा चारा तसेच औषधी मुल्याचा चारा दिला जातो, ज्यामुळे शेळ्यांना अनेक मोठ्या आजारांपासून संरक्षण मिळते. शेळ्यांनी खाऊन उरलेला चारा फेकून दिल्यानंतर कोंबड्या खातात. कोंबडी एका दिवसात ११० ते १३० ग्रॅम धान्य खाते. त्याचबरोबर कोंबड्या आणि शेळ्यांचे पालन केल्याने कोंबडीच्या खाद्याचा खर्च ३० ते ४० ग्रॅमने कमी होतो.कार्बन डायऑक्साइडच्या माध्यमातून कंपोस्ट खत निर्मिती : एक एकरावर शेळ्यांसोबत कोंबड्या पाळल्या तर शेळ्यांच्या खतापासून कंपोस्ट खतही तयार करता येईल. हे तयार केलेले कंपोस्ट तुम्ही शेळ्यांसाठी चारा निर्मितीसाठी वापरू शकता. याद्वारे पूर्णपणे सेंद्रिय चारा पिकवू शकाल. याशिवाय तुम्ही या कंपोस्टपासून चांगल्या प्रथिनांसह अ‍ॅझोला देखील वाढवू शकता.

# बहुगुणी औषधी वनस्पती माईनमुळा

उपयुक्त औषधी वनस्पती म्हणून जिचा वापर वेगवेगळ्या आजारावर केला जातो. या अतिशय उपयुक्त वनस्पतीचे नाव आहे 'माईनमुळा'. या वनस्पतीला संस्कृत मध्ये पाषाणभेद, हिंदीत पत्थरचूर या नावाने सुद्धा ओळखतात. या वनस्पतीच्या मुळांना बाजारात चांगली मागणी असते. माईनमुळ्याचा उपयोग श्वासासंबंधी रोग, रक्तदाब व पर्यायाने येणारे हृदयरोग व कॅन्सर यासारख्या आजारांवर होतो. माईनमुळ्याची भाजी, कोशिंबीर व लोणचे यांचा आहारात वापर केल्यास, यासर्व रोगांचे त्रास कमी होण्यास मदत होऊ शकते. पूर्वी हातकणंगले परिसरातील वडगाव, हेरले, नागाव या तीन चार गावांतच माईनमुळा लावला जाई. आता इतरत्रही लागवड होऊ लागली आहे. महाराष्ट्रात कोल्हापूर, सांगली व सातारा परिसरात या औषधी वनस्पतीची आंतरपीक म्हणून लागवड केली जाते.

माईनमुळ्याची लागवड : साधारणपणे जुलै ऑगस्ट महिन्यात या वनस्पतीची लागवड केली जाते. सर्वसाधारणपणे या वनस्पतीस १० ते २५ अंश से. तापमान व ८३ ते ९५ टक्के आर्द्रता मानवते. परंतु, उष्ण हवामान व कमी प्रमाणात आर्द्रता असल्यास पाणी दिल्याने वनस्पतीची वाढ चांगली होते. लागवडीस निचरा होणारी, रेताड, गाळाच्या जमिनी चांगल्या असतात. लागवड ही खोडाच्या छाट कलमाद्वारे करतात. माईनमुळ्याच्या दोन जातीची लागवड शेतकरी करतात उग्र वासाची जात औषधीसाठी वापरली जाते, तर सौम्य वास असलेल्या जातीचे लोणचे करतात. माईनमुळ्याच्या झुडुपास फुलांचे तुरे आले की ते खुडुन टाकतात. म्हणजे मुळे चांगली वाढतात. या वनस्पतीला कीड लागत नाही. मात्र बुरशी लागु नये म्हणून झाडांवर निंबोणीच्या अर्काची फवारणी करावी लागते. लागवडीनंतर साधारणपणे १४० ते १५० दिवसांनी मुळे काढण्यास तयार होतात. एकरी ५ टन माईनमुळ्यांचे उत्पादन होऊ शकते.

माईनमुळ्याच्या झुडुपास फुलांचे तुरे आले की ते खुडून टाकतात. म्हणजे मुळे चांगली वाढतात. या वनस्पतीला कीड लागत नाही. मात्र बुरशी लागू नये म्हणून झाडांवर निंबोणीच्या अर्काची फवारणी करावी लागते. लागवड केल्यापासून साडे तीन चार महिन्यात मुळे तयार होतात. मुळे अवघी अर्धा इंच ते पाऊण इंच जाडीची असतात. चार ते सहा इंच लांबीची असतात. त्यावर बारीक बारीक मुळे आणि त्यात अडकलेली माती असते. मुळे घरी आणल्यावर, साफ करणे जिकिरीचे काम असते. माईनमुळा साधारण नोव्हेंबर, डिंसेबर मधे बाजारात मिळतो. या औषधी वनस्पतीला बाजारात ३०,००० रुपये टन भाव मिळतो. यापासून तीन ते चार महिन्यातच शेतकरी लाखो रुपयाचा फायदा मिळवतात.

रोपे कुठे मिळतील : माईनमुळ्याची रोपे पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील नागार्जुन औषधी वनस्पती गार्डन येथे विक्रीस उपलब्ध आहे.



# केळी घडाची गुणवत्ता वाढविण्यासाठी उपाययोजना

जर आपण केळी पिकाचा विचार केला तर सगळ्यात पटकन डोळ्यासमोर येतो तो जळगाव जिल्हा होय. महाराष्ट्रामध्ये जळगाव जिल्ह्यात सर्वाधिक केळी पिकाची लागवड होते व उत्पादन देखील या जिल्ह्यात जास्त होते, म्हणून जळगाव जिल्ह्याला केळीचे आगार असे संबोधले जाते. जर आपण केळी पिकाचा विचार केला तर घडाच्या गुणवत्तेवर सर्व काही अवलंबून असल्यामुळे केळी पिकाची लागवड केल्यापासून उत्तम पद्धतीने काळजी घेणे खूप गरजेचे असते.

निर्यातक्षम उत्पादन घ्यायचे असेल तर केळी घडाची गुणवत्ता खूप महत्त्वाची भूमिका पार पाडते. घडाची गुणवत्ता वाढीसाठी काही छोटे परंतु महत्त्वाच्या उपाययोजना केल्या तर नक्कीच फायदा होऊ शकतो.

फण्यांची विरळणी करणे आवश्यक असते- केळी फळाच्या आकारमानामध्ये चांगले बदल करून येण्यासाठी घड लवकर परिपक्व होणे खूप गरजेचे असते. यासाठी फण्याची योग्य वेळी विरळणी करणे गरजेचे आहे. केळीच्या काही वानांमध्ये घडाला नऊ पेक्षा जास्त फण्या येतात. त्यामुळे अशा जास्त फण्या राहिल्या तर सर्वांना योग्य पोषण घटक न मिळाल्याने त्यांचे आकारमान एकसारखे राहत नाही व दर्जा ढासळतो. यासाठी एक घडावर सहा ते आठ फण्या ठेवून बाकीच्या विळ्याच्या साह्याने व्यवस्थितपणे कापून टाकणे गरजेचे आहे.



यामुळे फळे एकसारख्या आकाराची येतात.

जमिनीची मशागत- केळीच्या बागेतील जमीन वेळोवेळी स्वच्छ करणे गरजेचे असून ती कायम ठेवणे देखील महत्त्वाचे आहे. केळी बागेतील जमिनीची मशागत लागवडीनंतर तीन चार महिन्यात सुरू करणे गरजेचे असून या कालावधीत कोळपणी देऊ शकतात. परंतु त्याच्या पुढे हाताने चाळणी करण्याचा सल्ला जाणकारांकडून दिला जातो. झाडाला थोडीशी उंच भर ठिबकसाठी करावी. या भरीचा फायदा हा वाऱ्यापासून झाडाचे संरक्षण करण्यासाठी होतो.

बुंध्यालगतचे उपठोंब काढणे- बऱ्याचदा केळीच्या झाडाच्या बुंध्याला उपठोंब येऊ लागतात व ते वेळोवेळी काढणे गरजेचे आहे. त्यामुळे रोपाला संरक्षण मिळते. हे ठोंब काढण्याचे काम झाडाला फुले येईपर्यंत करणे गरजेचे आहे.

केळीमध्ये जर मिश्र पिकांची लागवड करायची असेल तर त्यांची निवड करताना मुख्य पिकातील अंतर, अन्नद्रव्यांचा पुरवठा इत्यादी बाबींची खूप काळजी घेणे गरजेचे आहे. खासकरून केळी बागेला करायचा अन्नद्रव्यांचा पुरवठा इत्यादी बाबींचा विचार करून केळीला मोहोर आल्यावर अशी पिके घ्यावीत. यामध्ये लक्षात घ्यावे की आंतर पिके ही मोहराच्या विरुद्ध दिशेने हवीत व पिकापासून दूर असावी.

केळफुल कापणे आहे गरजेचे- जेव्हा केळीची पूर्ण निसवन होते तेव्हा सर्व फण्या केळ कमळातून तून बाहेर पडतात. दोन ते तीन दिवसात खाली उमलणारे केळफुल धारदार विळाच्या साह्याने व्यवस्थित कापून घ्यावे. त्यामुळे केळफुलाला अनावश्यक होणारा अन्नपुरवठा हा वाढणाऱ्या घडास मिळतो घडाच्या उत्तम वाढीस मदत होते. तसेच सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे केळ फुलांमध्ये आसरा घेणाऱ्या रेड रस्ट थ्रीप्स या किडीचा प्रादुर्भाव कमी होतो.

नरकळ्या खुरडून टाकणे- नरकळ्या काढून टाकल्यामुळे घडावरील फळ वाढण्यासाठी मदत होते आणि फांदीचे वजन वाढते. त्यामुळे या नरकळ्या एक दोन हात लांबीवर एका बोटाचे अंतर ठेवून कापून टाकने महत्वाचे आहे.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### वेद दिन

### महत्वाच्या घटना

१६७९ : सिद्दी जौहर आणि इंग्रजांचा मारा रोखत मराठ्यांनी खांदेरी किल्ल्याभोवती एक मीटर उंचीचा तट उभारून पूर्ण केला.
१८१४ : दुसर्या बाजीरावाने पांडुरंग कोल्हटकराच्या साहाय्याने 'उंदेरी-खांदेरी' किल्ल्यांचा ताबा परत मिळवला.
१८२२ : ब्राझिलला (पोर्तुगालपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९०६ : 'बँक ऑफ इंडिया'ची स्थापना झाली. ही भारतात स्थापन झालेली पहिली स्वदेशी व्यापारी बँक आहे.
१९२३ : आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी पोलिस आयोग (आय. सी. पी. सी) ची स्थापना व्हीयना येथे करण्यात आली.
१९३१ : दुसर्या गोलमेज परिषदेची सुरूवात झाली.
१९७८ : मधुमेह नियंत्रित करण्यासाठी उपयोगी पडणारे इन्सुलिन प्रथमच जनुक अभियांत्रिकी पद्धतीने तयार करण्यात यश.
१९७९ : दिवाळखोरी टाळण्यासाठी 'ख्रायसलर कॉर्पोरेशन'ने अमेरिकन सरकारकडे १ बिलियन डॉलर्सची मागणी केली.
२००५ : इजिप्तमधे पहिल्यांदाच बहुपक्षीय सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या.
२००९ : भारतीय बिलियर्डस खेळाडू पंकज अडवाणी यांनी वर्ल्ड प्रोफेशनल बिलियर्ड्सचे जेतेपद जिंकले.
२०१८ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्ली येथे नीती आयोग द्वारे आयोजित वैश्विक गतिशीलता शिखर संमेलनाचे उद्घाटन केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९१ : उमाजी नाईक पहिला क्रांतिकारक स्वात्यंत्र्यसैनिक (मृत्यू: ३ फेब्रुवारी १८३२)
१८०७ : न्यूझीलंड देशाचे पहिले पंतप्रधान हेन्री सिवेल यांचा जन्म. (मृत्यू: १४ मे १८७९)
१८८७ : साहित्य अकादमी पुरस्कार व पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय संस्कृत विद्वान आणि महान दार्शनिक संस्कृत-तंत्र अभ्यासक, भारतीय शास्त्रज्ञ आणि तत्वज्ञ गोपीनाथ कविराज यांचा जन्मदिन.
१८२२ : रामकृष्ण विठ्ठल तथा भाऊ दाजी लाड प्राच्यविद्या पंडित, पुरातत्त्वज्ञ, कर्ते समाजसेवक आणि कुशल धन्वतंरी, ग्रँट मेडिकल कॉलेजच्या पहिल्या तुकडीतील विद्यार्थी (मृत्यू: ३१ मे १८७४)
१८२६ : बंगाल नवजागृतीचे प्रसिद्ध भारतीय बंगाली भाषिक लेखक राजनारायण बसु यांचा जन्मदिन.
१८४९ : बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर हिन्दुस्तानी शास्त्रीय गायक, ग्वाल्हेर गायकीचा महाराष्ट्रात प्रचार केला (मृत्यू: ८ फेब्रुवारी १९२७)
१९१२ : डेव्हिड पॅकार्ड ह्युलेट पॅकार्ड कंपनीचे एक संस्थापक (मृत्यू: २६ मार्च १९९६)
१९१५ : डॉ. महेश्वर नियोग प्रख्यात आसामी साहित्यिक आणि इतिहासकार, पद्मश्री (१९७४), आसाम साहित्य परिषदेचे अध्यक्ष (मृत्यू: १३ सप्टेंबर १९९५)
१९१७ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय चिकित्सक व वैज्ञानिक बानो जहाँगीर कोयाजी यांचा जन्मदिन.
१९२५ : भानुमती रामकृष्ण तामिळ व तेलगू चित्रपटांतील अभिनेत्री, दिग्दर्शक, निर्माती, गीतकार, संगीतकार, गायिका व लेखिका (मृत्यू: २४ डिसेंबर २००५)
१९३३ : इला भट्ट मॅगसेसे पारितोषिक विजेत्या समाजसेविका, वकील व 'सेवा' ' या संस्थेच्या संस्थापिका
१९३४ : सुनील गंगोपाध्याय बंगाली कवी व कादंबरीकार (मृत्यू: २३ आक्टोबर २०१२)
१९३४ : बी. आर. इशारा चित्रपट दिग्दर्शक आणि पटकथालेखक (मृत्यू: २५ जुलै २०१२)
१९४० : चंद्रकांत खोत लेखक व संपदक
१९६३ : अशोकचक्र पुरस्कार सन्मानित शूरवीर भारतीय वैमानिक नीरजा भनोट यांचा जन्मदिन.
१९६७ : भारतीय-इंग्लिश अकाउंटंट आणि राजकारणी आलोक शर्मा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६०१ : विल्यम शेक्सपियर यांचे वडील जॉन शेक्सपियर यांचे निधन.
१८०९ : थायलंडचा राजा बुद्ध योद्फा चुलालोके यांचे निधन.
१९५३ : भगवान रघुनाथ कुळकर्णी ऊर्फ 'फुलारी' ऊर्फ 'बी. रघुनाथ' लेखक व कवी (जन्म: १५ ऑगस्ट १९१३)
१९७९ : जनार्दन ग्यानोबा तथा 'जे. जी.' नवले भारतीय कसोटी क्रिकेट संघाचे पहिले यष्टिरक्षक(जन्म: ७ डिसेंबर १९०२)
१९९१ : रवि नारायण रेड्डी 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया' चे सहसंस्थापक (जन्म: ५ जून १९०८)
१९९४ : टेरेन्स यंग, चिनी इंग्लिश दिग्दर्शक आणि पटकथाकार (जन्म: २० जून १९१५)
१९९७ : मुकूल आनंद तांत्रिक करामतीचे जादूगार म्हणून नाव कमावलेले हिन्दी चित्रपट निर्माते व दिग्दर्शक (जन्म: ११ आक्टोबर १९५१)
१९९८ : गुजरात, मध्य प्रदेश आणि पॉन्डिचेरी या केंद्र शासित प्रदेशाचे माजी राज्यपाल के. एम चांडी यांचे निधन.
२०१३ : भारतीय परराष्ट्र सचिव, दिल्ली, अंदमान आणि निकोबार बेटांचे माजी उपराज्यपाल आणि त्रिपुरा, गोवा आणि उत्तर प्रदेश राज्यांचे माजी राज्यपाल रोमेश भंडारी यांचे निधन.

cmyk



राज्य लोकतंत्र
# मराठवाडा वृत्तांत



सोमवार दि.६ ऑक्टोबर २०२५



# काम करणाऱ्यांनाच आगामी निवडणुकीत संधी द्या:प्रा. राम शिंदे

## अमित चिंतामणी मित्रमंडळाच्या ओपन गरबा-दांडिया कार्यक्रमात महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

जामखेड। प्रतिनिधी

''जामखेड शहराला अडीचशे कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना मिळवून दिली. पण विधानसभेच्या निवडणुकीत नागरिकांचा आशिर्वाद कमी मिळाला, तरी मी नाराज नाही. शहराच्या विकासासाठी काम करणाऱ्यांनाच आगामी निवडणुकीत संधी द्या,'' असे आवाहन सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले. ते अमित चिंतामणी मित्रमंडळाच्या वतीने आयोजित ओपन गरबा-दांडिया कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. या कार्यक्रमाला महिलांचा आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसिद्ध मराठी अभिनेत्री प्राजक्ता माळी आणि सभापती प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी प्रा. मधुकर राळेभात, माजी सभापती डॉ. भगवान मुरूमकर, शरद कार्ले, भाजपा मंडळ अध्यक्ष बापूराव ढवळे, तसेच पवन राळेभात, महेश निमोणकर, पांडुरंग उबाळे, गुलशन अंधारे, राहुल बेदमुथा, मोहन पवार, विकी सदाफुळे, राहुल उगले, गणेश डोंगरे, ॲड. प्रवीण सानप, डॉ. विठ्ठल राळेभात, गोरख घनवट, भरत जगदाळे आदी मान्यवर उपस्थित होते. अमित चिंतामणी यांनी गेल्या अकरा वर्षांपासून हा सांस्कृतिक उपक्रम सातत्याने आयोजित करत स्थानिक महिलांना एकत्र आणण्याचे कार्य केले आहे.

### महिलांचा सहभाग लक्षणीय

नवरात्रोत्सवानिमित्त अमित चिंतामणी मित्रमंडळातर्फे आयोजित ओपन गरबा-दांडिया कार्यक्रमाला महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाला रंगत आणली. पारंपरिक पोशाख, आकर्षक प्रकाशयोजना आणि सुरेल संगीत यामुळे कार्यक्रमाचे वातावरण अधिकच रंगतदार बनले.

प्रा. शिंदे म्हणाले, ''सध्या शहराला नऊ दिवसांनी पाणी मिळत आहे. नवीन पाणीपुरवठा योजनेची कामे अंतिम टप्प्यात असून, काही दिवसांत ती पूर्ण होतील. पाणीपुरवठा आणि ड्रेनेज यंत्रणा सुधारल्यानंतर सर्व रस्त्यांना सिमेंट काँक्रिटचा दर्जा देण्यात येईल. नागरिकांनी थोडा संयम ठेवावा, लवकरच शहराचा चेहरामोहरा बदललेला दिसेल.''

# मोटार सायकल चोरणारे तीन आरोपी जेरबंद



जालना । प्रतिनिधी

जालना जिल्हयात मोटार सायकल चोरी करणाऱ्या ईसमाची माहिती घेऊन कारवाई करणे बाबत मा.पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. दिनांक ३०/०९/२०२५ रोजी दुर्गा माता मंदीर परिसरातील यात्रेमधुन फिर्यादी सुनिल श्रीधर दहिवाळ, यांची होंडा सीबी यूनिकॉर्न मोटार सायकल क्र.२१९९२२ ही अज्ञात चोरट्याने चोरी केल्याने याप्रकरणी सदर बाजार गुरनं ८३१/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दिनांक ०४/१०/२०२५ रोजी सदर गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदारामार्फत अशी माहिती मिळाली की, सदरची मोटार सायकल सचिन पाटीलबा जिगे वय २७ वर्ष रा. सिध्दीविनायक नगर, गणपती मंदीराजवळ चंदनझिरा जालना याने त्याचे साथीदार विकास ज्ञानेश्वर भुंबर वय २८ वर्ष रा. विठ्ठलनगर, चंदनझिरा जालना, गजानन विष्णु गवारे वय ३२ वर्ष रा. बुटेगाव ता. बदनापुर यांच्या मदतीने चोरी केली आहे. त्यानुषंगाने आरोपीतांना त्यांचे राहते परिसरातुन ताब्यात घेवुन त्यांच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्यांनी गुन्हयाची कबुली देवून गुन्हयातील चोरी केलेली मोटार सायकल काढुन दिल्याने ती जप्त करण्यात आली असुन पुढील तपासकामी आरोपीतांना सदर बाजार पोलीस ठाणे जालना येथे जमा करण्यात आले आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल वअपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि. योगेश उबाळे, सपोनि. सचिन खामगळ, पोउपनि. राजेंद्र वाघ व सोबत स्थागुशाचे अमंलदार भाऊराव गायके, प्रभाकर वाघ, रमेश राठोड, सागर बाविस्कर, इरशाद पटेल, संदीप चिचोले, सतिष श्रीवास, सौरभ मुळे यांनी केली आहे.

# महात्मा गांधी,लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरा

अंबड। प्रतिनिधी

मत्स्योदरी शिक्षण संस्था अंतर्गत कै . दत्तासाहेब देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय घनसावंगी येथे महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच अभिजात मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वंदना सपकाळ होत्या .

कॉलेजचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक केशव अटकर यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांचे विचार व कार्य याविषयी व अभिजात मराठी भाषा दिनाचे महत्व सांगितले प्रमुख मार्गदर्शक राजेंद्र मोरे होते. तसेच काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यावेळी उपस्थित कांता खोजे, संभाजी शिंदे. शंकर राठोड, नामदेव तोडकर,मोहसीन सय्यद, डॉ. लक्ष्मण गोरे ,प्रा.राजेंद्र सानप ,




प्रा.वर्षा धाईत, विष्णू गणकवार, जगन्नाथ जाधव,वंदना वाघमारे, हिरा टेकाळे, शामल कांगणे,अरुण राऊत, त्रिंबक लोंढे, विठ्ठल सोमवारे, संतोष घायाळ, बजरंग मोरे,रवी गवळी,संतोष लिंगणवाड, अच्युत रेचोडे. गीताराम शिंदे, सुनील मोताळे, गोविंद भुतेकर भीमाशंकर वाघुंडे,राजाराम काळे, नागनाथ गोंडगिरे,अरूण नाटकर, पाराजी जवळकर,कृष्णा भापकर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहनाज पठाण यांनी केले व आभार प्रदर्शन शबनम पठाण यांनी केले

# महात्मा गांधी,लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त जामखेडमध्ये सेवा पंधरवड्याचा समारोप

जामखेड। प्रतिनिधी

जामखेड शहरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसापासून दिनांक १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या पंधरा दिवसांच्या सेवा पंधरवडा निमित्त विविध उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आले. हे कार्यक्रम विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजपा शहरमंडल अध्यक्ष संजय काशिद यांच्या नियोजनातून पार पडले. सेवा उपक्रमांतर्गत रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान, आरोग्य शिबिर, पशुवैद्यकीय आरोग्य शिबिर, दिव्यांग व्यक्तींचा सन्मान, पंडित दीनदयाल जयंती निमित्त वृक्षारोपण, तसेच 'ओकल फॉर लोकल' (स्वदेशी नारा) कार्यक्रम आयोजित करण्यात आले. कार्यक्रमासाठी संयोजक म्हणून जेष्ठ नेते प्रवीण चोरडिया, माजी नगराध्यक्ष सोमनाथ राळेभात, चेअरमन उद्धव हुलगुंडे यांनी काम पाहिले.

महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती निमित्त सेवा पंधरवडा कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांत भाजपा ज्येष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात, शहरमंडल अध्यक्ष संजय काशिद, प्रवीण चोरडिया, माजी नगराध्यक्ष सोमनाथ राळेभात, आदर्श फाऊंडेशनचे अध्यक्ष आकाशशेठ बाफना, बाजार समितीचे संचालक डॉ. गणेश जगताप, तात्याराम पोकळे, अशोक महारनवर, युवा नेते मोहन देवकाते, सचिन भंडारी, आकाश बाफना, शिवकुमार डोंगरे, अशोक मोरे, अर्जुन म्हेत्रे, तुषार बोथरा आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जामखेड येथे अल्पमुदतीचे व्यावसायिक प्रशिक्षण

जामखेड। प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नविन उपक्रम विभागांतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जामखेड तसेच शासकीय तांत्रिक विद्यालय, जामखेड येथे अल्पमुदतीच्या व्यावसायिक प्रशिक्षण अभ्यासक्रमांना सुरुवात झाली आहे. या प्रशिक्षणामुळे स्थानिक युवक व युवतींसाठी रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध होणार आहेत. शासकीय मान्यतेचे हे प्रशिक्षण कार्यक्रम दोन ते पाच महिन्यांच्या कालावधीत पूर्ण होणार असून, पात्र उमेदवारांना रोजगारक्षम बनविण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, बॅचेस दहा ऑक्टोबर २०२५ पासून सुरू होणार आहेत. इच्छुकांनी तातडीने प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य मा. श्री. ए. के. वाघ यांनी केले आहे.

या प्रशिक्षणांतर्गत असिस्टंट ब्युटी थेरपिस्ट, सोलर पंप टेक्निशियन, टू व्हीलर सर्व्हिस टेक्निशियन, लाईट मोटर व्हेईकल ड्रायव्हर, फिटिंग वेल्डिंग फॅब्रिकेटर अँड प्लंबर, फिटिंग फॅब्रिकेशन, बेसिक इलेक्ट्रिशियन, सोलर एलईडी टेक्निशियन हे कोर्सेस उपलब्ध आहेत. सर्व कोर्सेससाठी पात्रता इयत्ता दहावी उत्तीर्ण असून, प्रत्येक कोर्ससाठी प्रवेश क्षमता ३० विद्यार्थी एवढी आहे. ऑनलाईन अर्जासाठी शासनाच्या संकेतस्थळावर अर्ज करता येईल. अधिक माहितीसाठी गायकवाड डी. डी. (गटनिदेशक) ९८२२२ ५२५५०, जाधव जी. बी. (गटनिदेशक) ९०९६८ ३०८३४, सकनुरे एस. आर. ८००७९ २४०७१, सुद्रिक एस. एस. ९४२१६ १८००२ या क्रमांकावर संपर्क साधावा. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील युवकांना कौशल्य विकासाद्वारे आत्मनिर्भर बनण्याची संधी मिळणार असून, स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मितीला चालना मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# सीमोल्लंघन सोहळ्यासाठी नगरची पालखी

## पौर्णिमेदिनी तुळजाभवानी होणार सिंहासनावर पुन्हा विराजमान

अहिल्यानगर

संबळाच्या कडकडाटात अन्? ''आई राजा उदो उदो'' च्या गजरात पहाटे कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेचा सीमोल्लंघन सोहळा नगरच्या पालखीत बसून उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात पार पडला. यावेळी कुंकवाची मुक्त हस्ते उधळण करण्यात आली. तुळजाभवानी माता कुंकवाने न्हाऊन निघाली. सीमोल्लंघन सोहळ्यानंतर तुळजाभवानी माता निद्रेसाठी नगरच्या पलंगावर विसावली. पाच दिवसांच्या श्रमनिद्रेनंतर आश्विन पौर्णिमेदिनी तुळजाभवानी माता सिंहासनावर विराजमान होईल, अशी माहिती पलंग पालखीचे मुख्य मानकरी सागर भगत यांनी दिली. दरम्यान, सीमोल्लंघन सोहळ्यानंतर पलंग पालखीचे मुख्य मानकरी म्हणून सागर भगत व परिवाराचा तुळजाभवानी मंदिर ट्रस्टतर्फे ट्रस्टचे अध्यक्ष तथा धाराशिवचे जिल्हाधिकारी किर्तीकुमार पुजारा, विश्वस्त आमदार राणा जगजितसिंह पाटील, धाराशिवचे पोलीस अधीक्षक यांच्याकडून सत्कार करण्यात आला.

तुळजाभवानी मातेची मूर्ती सीमोल्लंघन सोहळ्यासाठी अहिल्यानगरमधील बुऱ्हाणनगर येथील पालखीत ठेवण्यात आली. त्यानंतर आई राजा उदो-उदो च्या गजरात आणि संभळाच्या कडकडाटात पालखीतून प्रदक्षिणा मार्गावर प्रदक्षिणा मारण्यात आली. यावेळी प्रदक्षिणा मार्गावर पिंपळाच्या पारावर तुळजाभवानी माता काही काळ विसावली. यावेळी पारावर देवीला भगत कुटुंबियांच्यावतीने नैवेद्य दाखवून मानाच्या आरत्या करण्यात आल्या. यावेळी यावेळी पलंग पालखीचे मुख्य मानकरी व बुऱ्हाणनगर देवीचे पुजारी सुदाम जगन्नाथ भगत, ज्ञानेश्वर गोकुळ भगत, शिवराम भगत, संतोष भगत, देविदास भगत, सागर भगत, दीपक भगत, मंगेश भगत, वसंत भगत, निलेश भगत आदींसह पुजारी, मानकरी, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तत्पूर्वी मध्यरात्री १२ वाजता अभिषेक पूजेस प्रारंभ करण्यात आला. यानंतर धुपारती होऊन गाभाऱ्यात दोन धार्मिक विधी करण्यात येऊन तुळजाभवानी मातेची मूर्ती सीमोल्लंघन सोहळ्यासाठी नगरच्या पालखीत ठेवण्यात आली. सीमोल्लंघन सोहळ्यानंतर तुळजाभवानी माता नगरच्या नव्या पलंगावर श्रम निद्रेसाठी सिंह गाभाऱ्यात विसावली. त्यानंतर रात्रभर खुले असणारे मंदिर बंद करण्यात आले व पुन्हा लगेच सकाळी ७.३० वाजता चरणतीर्थ पूजेनंतर मंदिर उघडण्यात आले.

# पुरग्रस्तांना साहित्यांचे वाटप



जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून मुसळधार पाऊस झाला आहे. तसेच गोदावरी नदीच्या पात्रामध्ये जायकवाडी धरणातून तीन लाख क्युसेक्स पाण्याचा विसर्ग करण्यात आला. तसेच खडकपुर्णा प्रकल्पातूनही एक लाख क्युसेसपेक्षा अधिक जलविसर्ग करण्यात आलेला आहे.

तरी या पार्श्वभूमिवर जिल्ह्यातील गोदावरी काठावरील तसेच पुर्णा नदीवरील पुरग्रस्तांना धान्य व अन्य शिधा वस्तु जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या निर्देशानूसार वितरीत करण्यात आल्या.

जालना जिल्ह्यातील पुरामुळे बाधित झालेल्या आपेगाव, साष्ट पिंपळगाव, सुखापुरी, पिठोरी सिरसगाव, जोगलादेवी, वाणेगाव, आंतरवाली टेंभी या गावातील नागरिकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील शिधा वस्तुंचे वितरण जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आली आहे.

वाटप करण्याची प्रक्रिया अंबड तहसील विभागाचे पुरवठा निरीक्षक किरण कुमार खांडेभराड यांच्या नियंत्रण खाली करण्यात आली तसेच त्यांनी मदत केली.

# शेतकरी पुत्राची कमाल! अमेरिकेत घेणार ८४ लाखांचं पॅकेज

नांदेड। प्रतिनिधी

जिल्ह्यात अतिवृष्टी आणि पूरस्थितीने शेतकरी पार कोलमडून गेला आहे. शेतात भयावह आणि चिंताग्रस्त अशी स्थिती आहे. अशा या स्थितीत जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर आणि हलाखीच्या परिस्थितीला मात करत नांदेडच्या एका शेतकरी कुटुंबातील मुलाने परदेशात नोकरी मिळवली आहे. जयपाल शिरदे असं नाव असून त्याला अमेरिकेतील प्रसिद्ध हनवेल ऑटोमेशन कंपनीत नोकरी मिळाली आहे. महिण्याकाठी सात हजार १३ डॉलर म्हणजेच जवळपास सात लाख रुपये पगार मिळणार आहे. या सुखद बातमीने शेतकरी कुटुंबात आशेचा किरण निर्माण झाला आहे. तसेच मुलाने आई-वडिलांच्या कष्टाचं चीज केल्याने तो इतरांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

जयपाल शिरदे हा नांदेड जिल्ह्यातील नायगाव तालुक्यातील तकबीड या छोट्याश्या गावातील रहिवासी आहे. त्याचे वडील गणेश शिरदे हे शेतकरी असून पाच एकर कोरडवाहू शेती आहे. त्यांना तीन मुलं देखील आहेत. हालाकीच्या परिस्थितीत त्यांनी आपल्या मुलांना शिकवले. जयपाल याच प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेत झालं. त्यानंतर माध्यमिक शिक्षण परिमल महाविद्यालयात लातूर येथे पूर्ण केले.२०२१ मध्ये जळगाव येथील शासकीय कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे बी टेक पूर्ण केले. शिक्षण पूर्ण केल्यानंतर नामांकीत ऑटोमेशन कंपनीत नोकरी लागली.

एवढ्यावरच न थांबता जयपाल यांने विदेशात नोकरी करण्याचे स्वप्न बाळगत प्रयत्न सुरूच ठेवले. काही दिवसापूर्वी अमेरिकेच्या हनवेल ऑटोमेशन कंपनीकडून चेन्नई येथे मुलाखती घेण्यात आल्या. देशभरातून शेकडो उमेदवार आले होते. त्यात जयपाल शिरदे हा एकमेव पात्र ठरला. हनवेल ऑटोमेशन ही सॉफ्टवेयर कंपनी टेक्सास राज्यातील डलास येथे कार्यरत असून अमेरिकेत प्रसिद्ध आहे. विशेष म्हणजे जयपाल याला महिण्याकाठी सात लाख रुपये पगार मिळणार आहे.

एकीकडे नांदेड जिल्ह्यात पावसाने हाहाकार माजवला आहे. शेती पिकाचे मोठे नुकसान झाले आहे.नायगाव तालुक्याला ही शेती पिकाला फटका बसला आहे. शेतकरी हतबल झाले असून त्यातच एका शेतकरी कुटुंबातील मुलाने यशाचे शिखर पार करत आई वडिलासोबतच नांदेडचे नाव उंचावले आहे. त्याच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# शाळकरी मुलीचा विनयभंग

अंबड। प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील एका शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलीचा विनयभंग करण्यात आला याप्रकरणी एक १४ वर्षीय मुलीच्या तक्रारीवरून अंबड पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे . आरोपी सुनील विठ्ठल म्हस्के रा. खडकेश्वर ता. अंबड याच्या विरोधात ५५०/२०२५ कलम ७४,७५,७८,७९,३५१ (२) (३) सह कलम १२ बाललैगिक याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला तसेच या प्रकरणी आरोपीला न्यायालयामध्ये हजर केले असता सदरील आरोपीला न्यायालयीन कोठडी देण्यात आली. सदरील घटना ताडहदगाव येथील एका शाळे समोर घडली होती. यामध्ये फिर्यादी मुलगीअल्पवयीन असल्याचे आरोपीस माहीत असून त्यांनी तिचे सोबत लग्न करण्याचे उद्देशाने ती मुलगी शाळेत व घरी जाताना वेळोवेळी पाठलाग करुन तिचे कडे वाईट नजरेने पाहून मोटर सायकलचे हॉर्न वाजवून इशारे करुन वेळोवेळी पाठलाग करून मुलीला म्हणाला की माझे सोबत लग्न कर म्हणुन धमकी देतो होता. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक श्री ठुबे यांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास पोलीस उपनिरीक्षक आदिनाथ ढाकणे यांच्याकडे देण्यात आला याप्रकरणी आरोपीला तत्काळ अटक करून न्यायालय मध्ये हजर करण्यात आले होते यावेळी न्यायालयाने आरोपीला न्यायालयीन कोठडी देण्यात आली.

cmyk

# आधारचा मोठा घोळ, दोन मुलांचा एकच आयडी

## रहिवासी मात्र वेगळ्या ठिकाणचे, एनरॉलमेंट नंबरही वेगळा, पालकांना मनस्ताप

**बीड | प्रतिनिधी**

**सरकारी ऑनलाईन कामांमध्ये कधी काय होईल सांगता येत नाही .या ऑनलाइन प्रक्रियेमध्ये सुलभता असली तरी अनेक वेळा यामुळे अनेकांची अडचण होते. असाच एक प्रकार बीड तालुक्यामध्ये घडलेला आहे. भारतीय विशिष्ट पहचान प्राधिकरणाने म्हणजे आधार ने बीड तालुक्यातील दोन मुलांच्या बाबतीत मोठा घोळ घालून ठेवला आहे. एकाच नावाची दोन मुले त्यांची जन्मतारीख वेगळी, रहिवासी वेगळ्या ठिकाणचे, ईमेल वेगळा तरीही या दोन मुलांना आधार ने एकच आयडी दिला आणि तेव्हापासून या दोन्ही मुलांच्या पालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे .**

बीड शहरातील हसनैन इम्रान पठाण राहणार सय्यद अली नगर या मुलाची जन्मतारीख १५ /१२ / २०१९ आहे .त्याचा ईमेल आयडी वेगळा, मोबाईल नंबर वेगळा ,आधार कार्डची नोंदणी तारीख वेगळी ,त्याचा एनरोलमेंट नंबर वेगळा तरीही त्याला ९९ ३३ ६७ १७ ७१ ७७ हा एकच नंबर आधार ने दिला. दुसरा मुलगा बीड तालुक्यातीलच नागापूर खुर्द या गावचा हसनैन इम्रान पठाण याची जन्मतारीख २ /१० /२०१९ त्याचाही ईमेल आयडी वेगळा, मोबाईल नंबर वेगळा ,जन्मतारीख ही वेगळी ,मात्र आधार कार्डवर त्याच्या ९९ ३३ ६७ १७ ७१ ७७ हाच नंबर आहे. या नंबरने मोठा घोळ घातला असून शैक्षणिक कामासाठी या दोघांनाही अनेक




समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. एखाद्याने ऑनलाइन केले की त्याचा ओटीपी दुसऱ्या पालकाला जातो. आणि दुसऱ्याने काही कागदपत्रे अपलोड केली की त्याचा मेसेज हा पहिल्या पालकाला जातो. हा मोठा घोळ झाला असून दोन्ही पालक सध्या या प्रकरणाने त्रस्त झाले आहेत. एकाच कामासाठी दोघांनाही कागदपत्रे अपलोड करता येत नाहीत. एकाने अपलोड केलेली कागदपत्रे दुसऱ्याला अपलोड करता येत नाहीत. आधार एकाने अपडेट केला की दुसऱ्याची अडचण होते. हा गंभीर प्रकार असून या दोन्ही पालकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. मोबाईल नंबर वेगळा असताना, ईमेल आयडी वेगळा असताना, एनरोलमेंट नंबर वेगळा असताना आणि आधार प्रक्रियेची तारीखही वेगळी असतांना या दोघांना एकच नंबर मिळाला कसा ? हा मोठा प्रश्न आहे. हे दोघेही संबंधित आधार सेंटरवर जातात. मात्र त्यांना योग्य उत्तर मिळत नाही. ही प्रक्रिया वरूनच झाली आहे आम्ही त्याला काही करू शकत नाही असे सांगितले जाते. या पालकांनी नेमके जायचे कोठे आणि दाद कोणाला मागायची हा मोठा प्रश्न आहे. सध्या तरी हा प्रश्न सुटत नाही .त्यामुळे दोन्हीही पालक चिंतेत असतात .अनेक वेळा महत्त्वाच्या कामासाठीही त्यांना या आधार नंबर वर प्रक्रिया करता येत नाही. आता हा प्रश्न नेमका कोण सोडणार ? हाच मोठा प्रश्न आहे. या प्रकाराने दोन्ही पालक त्रस्त झाले आहेत.

# पुरग्रस्तांसाठी मदत करणारी राज्यातील पहिली बाजार समिती कृषी उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाई

अंबाजोगाई | प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात अतिवृष्टी झाली असल्यामुळे सर्वत्र पुरग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे. सदर परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांचे व नागरीकांचे न भरुन निघणारे नुकसान झालेले आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री महोदया यांनी केलेल्या आव्हानानुसार कृषि उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाईचे कर्मचारी यांनी त्यांचे एक दिवसाचा पगार आणि उर्वरीत बाजार समितीच्या स्वनिधीतुन देणगी स्वरुपात आर्थिक मदत करण्यांचा निर्णय घेतलेला आहे.

त्यानुसार कृषि उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाईचे सभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री. राजेश्वर चव्हाण, व सर्व संचालक मंडळ, कर्मचारी या सर्वांनी पुढाकार घेऊन सर्वांचा एकदिवसाचा पगार



आणि बाजार समिती स्वनिधी असे एकुण रक्कम रुपये १,००,०००/- पुरग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी या नावाने चेक क्र. ३०१ ०३४ दि.०४/१०/२०२५ रोजी माननीय आ.श्री. धनंजयजी मुंडे साहेब यांच्या कडे सुपुर्द करण्यात आला. तसेच अजित पवार उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य व माननीय आ. श्री. धनंजयजी मुंडे साहेब यांचे अभिष्टचिंतन निमित्ताने कृषी उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाने मार्केट यार्डातील हमाल मापडी या असंरक्षीत कामगाराचा जनता अपघात विमा बाजार समितीने काढून कै.पंडित अण्णा मुंडे पुण्यस्मरण या दिवशी माननीय आ. श्री. धनंजय जी मुंडे साहेब यांच्या हस्ते व माननीय श्री ड. राजेश्वर चव्हाण सभापती व सर्व संचालक मंडळ यांचे उपस्थित वाटप करण्यात आले.


# चिंचवण येथे मंगळवारी जगदंबा यात्रा महोत्सव

### जंगी कुस्तींचीही दंगल रंगणार

वडवणी | प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचवण गावामध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्री.जगदंबा माता (तुळजाभवानी) देवीची दोन दिवसीय यात्रा भक्तीमय वातावरणात आणि मोठ्या जल्लोषात साजरी होणार आहे.

पंचक्रोशीतील भाविकांसाठी ही यात्रा म्हणजे एकप्रकारे आध्यात्मिक पर्वणीच असून तुळजापूर नंतरचे दुसरे महत्त्वाचे ठाण म्हणून या मंदिराची ख्याती आहे. कृष्णदेवराय काळातील हेमाडपंथी वास्तूत उभे असलेले हे



अतिभव्य व सुंदर मंदिर चिंचवण नगरीचे वैशिष्ट्य ठरते. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्री.जगदंबा माता (तुळजाभवानी) पान २ वर

# सर्व जाती धर्माच्या लोकांनी परस्पराशी भेदभाव न करता एकत्र रहावे –ज्ञानदेव महाराज जळकीकर

**म्हसोबावाडी | प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताह सोहळा सुरू आहे. या निमित्ताने हरिभक्त परिवाराचे ह.भ.प. ज्ञानदेव महाराज जळकीकर यांचे कीर्तन झाले. कीर्तनातून त्यांनी समाजात एकतेचा संदेश दिला.**

महाराजांनी सांगितले की, सर्व जाती–धर्माच्या लोकांनी परस्परांशी भेदभाव न करता एकत्रित रहावे. समाजात प्रेमभावाचे वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. यासाठी 'गुण्या गोविंदाने' रहाणे अत्यावश्यक आहे. भगवद्नामाचे सतत स्मरण करणाऱ्या माणसाचे



मन शुद्ध होते आणि तो सर्वांबद्दल प्रेमभाव बाळगू शकतो, असे ते म्हणाले. महाराज म्हणाले आम्ही एक मिनिटामध्ये कीर्तनात भांडण लावून जाऊ शकतो परंतु तुम्हाला गावात राहायचे असते. जगात वारकरी संप्रदाय ज्ञानदानाचे काम करते. जिथे पाय डुलते ती गायक नसते, जिथे मान डूलते ते गायनाचार्य असते. गृहस्थ का काम भिक्षा देना संन्यासी का काम दीक्षा देना यावेळी सांगवी पाटण व पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात गावागावातून आलेल्या भाविकांनी उत्साहात सहभाग घेतला. पान २ वर

# शिक्षण विभागाची बदनामी करणाऱ्या अंशकालीन निदेशक अदनान खानविरुद्ध अब्रु नुकसानीचा गुन्हा दाखल करणार

### गेवराईचे बीईओ शिंदे यांनी सीईओंकडे मागितली परवानगी

**बीड | प्रतिनिधी**

अंशकालीन निदेशक म्हणून काम केलेल्या अदनान खान यांनी चुकीची बातमी छापून शिक्षण विभागाची बदनामी केली आहे. संबंधिताने जाणीवपूर्वक बदनामी करून शिक्षण विभागाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला आहे. याप्रकरणी शिक्षण विभाग आणि जिल्हा परिषदेची बदनामी झाल्याने अब्रुनुकसानीचा दावा ठोकण्याची परवानगी देण्यात यावी, अशी विनंती गेवराई तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी धनंजय शिंदे यांनी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या पत्रात श्री.शिंदे यांनी म्हटले आहे की, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उर्दू गेवराई येथे सन २०१७ मध्ये अदनान खान हे अंशकालीन निदेशक म्हणून कार्यरत होते. राज्य शासनाच्या निर्देशानुसार सन २०१८ मध्ये सर्व अंशकालीन निदेशकांना कार्यमुक्त करण्यात आले होते. तथापि मा. उच्च न्यायालयाच्या याचिकेमधील अंशकालीन निदेशकांना महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांनी न्यायालयाच्या आदेशानुसार अंशकालीन निदेशकांना रूजू करून घेण्यासंदर्भात आदेश दिले होते; त्यानुसार शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद, बीड यांच्या मान्यतेनुसार संबंधितांच्या जागेवर अन्य निदेशकास रुजू करून घेण्यात आलेले आहे. परंतु मला रुजू करून न घेता दुसर्यास कसे काय रूजू करून घेतले ? आता तुमच्याकडे बघतो.अशी धमकी देत ब्लॅकमेल करून बदनामीकारक बातम्या छापत आहेत. संबंधिताने कार्यालयात येऊन मी तुम्हाला काम करून देणार नाही असे म्हणून धमकी दिली असून बदनामीकारक बातम्या छापणे सुरू केले आहे. संबंधिताला रुजू करून मा. न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करता येत नाही. त्यामुळे आपले काम झाले नाही याचा राग मनात धरून बातम्या छापणे सुरू केले आहे. वृत्तपत्रातील बातम्यांमुळे शिक्षण विभाग व जिल्हा परिषदेची बदनामी होत असल्याने या प्रकरणी संबंधिताला अवमान नोटीस देऊन अब्रू नुकसानीचा दावा दाखल करण्यासाठीची परवानगी देण्यात यावी, अशी विनंती जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे.

# शेतकऱ्यांच्या खरडून गेलेल्या जमिनीला पुनर्भरणासाठी भरीव मदत करा –बदामराव पंडित

गेवराई | प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघासह बीड जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने सर्व पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे त्यासोबतच अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीवरील माती खरडून वाहून गेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पीक नुकसान भरपाई देण्यात यावी पण त्यासोबतच जमीन करून वाहून गेलेल्या शेतकऱ्यांसाठी जमीन पुनर्भरण करण्यासाठी आर्थिक मदत करावी अशी मागणी



माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी मुख्यमंत्री ना देवेंद्र फडणवीस आणि कृषी मंत्री ना दत्ता मामा बारणे यांच्याकडे केली आहे.

गेवराई तालुक्यातील दगडगाव, औरंगपूर कुकडा येथील शेतकरी विविध मागण्यांसाठी दिनांक ३ ऑक्टोबर २०२५ पासून बेमुदत धरणे आंदोलनावर बसले आहेत. अतिवृष्टीमुळे आणि सिंदफणा पात्रात पाणी सोडल्याने पूर परिस्थिती निर्माण झाल्याने आमच्या सर्व पिकांचे अतोनात नुकसान तर झाले आहेच पण त्यासोबत आमच्या जमिनीची माती सुद्धा वाहून गेली असून संपूर्ण जमीन खडकाळ पान २ वर

# शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेतर्फे विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण

**वडवणी | प्रतिनिधी**

राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्या वतीने दिनांक ०३/१०/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी १० वा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बीड येथे महाराष्ट्र राज्य चे प्रमुख धर्मशिल मिश्राम सर यांच्या नेतृत्वाखाली व माजी प्रकल्प संचालक तथा भाजपा कामगार मोर्चा बीड जिल्हा अध्यक्ष ओमप्रकाश गिरी सर व शेख अफसर बशीरमिया सर क्षेत्रीय अधिकारी यांच्या प्रमुख



उपस्थितीत एक दिवसीय उपोषण व लक्षवेधी आंदोलन करण्यात आले . राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या पदावर २००४ पासून अत्यंत अल्प मानधनावर कार्यरत होते. सदरील प्रकल्प हा २०२१ पासून समग्रह शिक्षा अभियानात विलिन करण्यात आला आहे. विलीन करताना

यामध्ये महाराष्ट्रातील सोळा जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांचा कोणताही शिक्षक कर्मचारी चा विचार करण्यात आलेला नाही . बीड पान २ वर



# देवगाव येथील शिक्षकांना निरोप शालेय साहित्य व खाऊ वाटप

वडवणी | प्रतिनिधी

ग्रामीण भागात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महत्वाची भूमिका ग्रामीण शिक्षणामध्ये बजावत असते.येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्व सेवा सुख–सुविधा आणि शिक्षण चांगल्या प्रकारे मिळावे यासाठी सर्वजण अतोनात प्रयत्न नेहमीच करत असतात विद्यार्थ्यांच्या आयुष्यात महत्त्वाची भूमिका ते शिक्षक बजावत असतात तेच त्यांचे पहिले गुरु असतात असे म्हणायला हरकत नाही.तसेच आपण ज्या शाळेमध्ये शिकलो ज्या गावात आपण लहानचे पान २ वर

# स्वखर्चाने विकासकामे, नागरिकांत समाधान

### सामाजिक कार्यकर्ते कैलास ठोंबरे यांच्या दर्यादिलीचे कौतुक

**दिंद्रुड | प्रतिनिधी**

दिंद्रुड येथे सामाजिक कार्यकर्ते कैलास ठोंबरे यांनी विविध विकास कामांचा धूमधडाका लावला आहे.

येथील दोन मुख्य रस्त्यालगत असलेल्या एका रस्त्यात पडीक बांधकाम पडल्याने अनेक वर्षांपासून बंद असलेल्या रस्त्याची स्वखर्चाने त्यांनी दुरुस्ती केली.सामाजिक कार्यकर्ते कैलास ठोंबरे यांच्या दर्यादिली मुळे गावातील अनेक प्रश्न मार्गी लागत असल्याने दिंद्रुड च्या गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.



येथील महादेव मंदिराकडे जाणारा मुख्य रस्ता व मारोती मंदिराकडे जाणारा मुख्य रस्त्यालगत छोटा पण रहदारीसाठी महत्त्वाच्या रस्त्यावर दोन पडीक बांधकामाचे साहित्य पडून पायवाटी इतपत दुरवस्था झाली होती.सामाजिक कार्यकर्ते पान २ वर

# जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन –प्रा.बबनराव आंधळे

बीड | प्रतिनिधी

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष २०२५ चे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यात सहकारी शिक्षण प्रशिक्षण प्रचार व प्रसिद्धीचे कार्य करणाऱ्या महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे यांच्या वतीने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड व बीड जिल्हा सहकारी बोर्ड लिमिटेड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेचे आयोजन दिनांक १३ १० २०२५ वार सोमवार रोजी सकाळी ठीक १०.३० ते संपेपर्यंत आय सी हॉल केस के



महाविद्यालय बीड या ठिकाणी करण्यात आले आहे या जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेचा विषय सहकारातून समृद्धी असा आहे या स्पर्धेत प्रथम येणाऱ्या स्पर्धकास महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे यांच्या वतीने प्रथम क्रमांकास रुपये १००० व द्वितीय स्पर्धकास रुपये ५०० असे पारितोषिक देण्यात येणार आहे संपूर्ण महाराष्ट्रभर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र राज्य सहकार संघ पुणे यांच्यावतीने करण्यात येणार आहे वरिष्ठ महाविद्यालयातील युवक युवतीचा सहकार चळवळीमध्ये सहभाग वाढावा सहकार पान २ वर

# बीड, शिरूर कासार तालुक्यात ६०० किराणा किटचे वाटप

## कल्पतरू, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद व मराठी कलाकारांचा उपक्रम

**बीड | प्रतिनिधी**

कल्पतरू बीड, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद आणि मराठी नाट्यकलाकार यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.४) बीड आणि शिरूर कासार तालुक्यातील पूरग्रस्तांना मदत म्हणून ६०० किराणा किटचे वाटप करण्यात आले. घरात पाणी शिरलेल्या विविध गावांतील कुटुंबांना ही मदत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर आणि



उपस्थित कलावंतांच्या हस्ते देण्यात आली.

यावेळी कलाकार ऋतुराज फडके, प्रसाद दाने, श्रेयस राजे, सौरभ पात्रुडकर, गौरव कुलकर्णी, ललित कुलकर्णी, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते भागवत तावरे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे प्रा. डॉ. संजय पान २ वर

### शहरात डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या हस्ते वाटप

बीड शहरातील नाळवंडी नाका परिसर व प्रकाश आंबेडकर भागात पुरग्रस्त कुटुंबांना डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांच्या हस्ते किराणा किट वाटप करण्यात आले. यावेळी अश्विनीताई गुंजाळ, दत्ता जाधव, गोरख काळे, संगीताताई वाघमारे, शाकेरा शेख, प्रेमराज गुंजाळ यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### मैत्री प्रतिष्ठानचा मदतीसाठी पुढाकार

जेबा पिंपरी येथील ग्रामपंचायत सदस्य शौकत रशीद सय्यद यांच्या पुणे येथील मैत्री प्रतिष्ठान तर्फेही पूरग्रस्तांना साहित्य वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी सय्यद यांच्या पुढाकाराचे गावात कौतुक होत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# फोक प्रबोधन'च्या माध्यमातून अभिजात मराठी भाषा सप्ताहात रसिकांनी अनुभवला मराठी संस्कृतीचा भावस्पर्शी संगम

**पिंपरी । प्रतिनिधी**

मराठी भाषेचे माधुर्य, लोकसंगीताची लय आणि मातीच्या गंधात रुजलेली लोकपरंपरा... या तिन्हींचा सुरेल संगम पिंपरी चिंचवड महापालिका आयोजित अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या निमित्ताने सादर झालेल्या 'फोक प्रबोधन' कार्यक्रमातून रसिकांनी अनुभवला. लोककलांच्या सजीव स्वरांनी, नृत्यांच्या तालांनी आणि मराठी अस्मितेच्या ओलाव्याने भरलेला हा सोहळा केवळ कलात्मक मेजवानी नव्हे, तर मराठी संस्कृतीच्या शतकांपूर्वीच्या लोकसंस्कृतीच्या ठेवा नवपिढीपर्यंत पोहोचवणारा ठरला. मराठी संस्कृतीतील शब्द, संगीत आणि नृत्य यांचा सुरेख संगम अनुभवताना रसिकांनी या कार्यक्रमाला भरभरून दाद दिली.

पिंपरी चिंचवड महापालिका आयोजित तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखा आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखा यांच्या सहकार्याने तसेच श्री भैरवनाथ सार्वजनिक ग्रंथालय, भोसरी आणि हुतात्मा चापेकर सार्वजनिक ग्रंथालय, चिंचवड यांच्या सहभागातून ३ ते ९ ऑक्टोबर २०२५ दरम्यान 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' साजरा करण्यात येत आहे.

महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात येत असलेल्या या महोत्सवात चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात 'फोक प्रबोधन' हा कार्यक्रम सादर झाला. याप्रसंगी महापालिकेचे विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, मनोज डाळिंबकर यांच्यासह महापालिकेचे ग्रंथपाल प्रतिभा मुनावत, वर्षा जाधव, राजु मोहन, वैशाली थोरात, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे गट निदेशक शर्मिला काराबळे, रविंद्र ओव्हाळ, बबिता गावंडे, संगीत शिक्षक संतोष साळवे, उमेश पुरोहित आदी महापालिकेतील अधिकारी, कर्मचारी आणि रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकसंगीत, नृत्य, भारूड, अभंग आणि पारंपारिक वाद्य यांचा रंगतदार संगम सादर करणाऱ्या 'फोक प्रबोधन' या कार्यक्रमाची सुरुवात 'पिंगळा महाद्वारी' आणि 'आला वासुदेव तुमच्या दारी' या मराठी संस्कृतीच्या सांस्कृतिक वाहकांच्या प्रतिकांच्या कलात्मक सादरीकरणातून झाली. सूत्रसंचालक शेखर नवतरे आणि दाऊद इनामदार यांच्या ओघवत्या निवेदनातून मराठी भाषेचा अभिजात





दर्जा, तिचा संस्कारांचा ठेवा आणि मातीचा सुगंध अधोरेखित करण्यात आला. पारंपारिक वाद्य आणि मराठी कलेचा इतिहास यावेळी त्यांनी उलगडला. मराठी संस्कृतीतील वाद्य, गाणी ही केवळ मनोरंजनाची माध्यमे नसून त्यामध्ये भावनांचा आणि वेदनांचा अंतर्भाव आहे, असेही त्यांनी सांगितले. ज्या भाषेला इतिहास आहे, संस्कारांची जोड आहे, मातीचा गंध आहे, ती म्हणजे आपली मराठी! या त्यांच्या वाक्याने सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.

लोककलांचा प्रवास या कार्यक्रमातून पुढे जात असताना 'गोंधळी' परंपरेचे दर्शन घडवले गेले. यामध्ये लोककलेतील पारंपरिक गोंधळ कसा आणि का घातला जातो, याचे कलाकृतीतून सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर झालेल्या गण सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध झाले. 'जोगवा' या लोककलेच्या धाग्याने प्रेक्षकांना भारावून टाकले. या माध्यमातून कलाकारांनी त्या परंपरेतील व्यथा, वेदना आणि भावना प्रकट केली. 'पोतराज' या प्रकारात समर्पणाचे भावसंपन्न दर्शन उलगडून सांगितले.

शाहीरी परंपरेतून छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम 'जय भवानी जय शिवाजी' आणि 'चमके शिवबाची तलवार' या गजरात उजळून निघाला. त्यानंतर बासरीवादन, वारकरी भजन आणि 'ज्ञानेश्वर माऊली, जय जय विठ्ठल' च्या गजरात रंगमंचावर कलाकारांनी दिंडी सोहळा साकारला. दिव्यांग कलाकार ऋषी मोरे यांनी 'भल्या माणसा...' हे गीत सादर करत प्रेक्षकांना भावनिक साद घातली. रंगमंचावरच काही क्षणात वेशभूषा बदलत सादर करण्यात आलेल्या 'आल्या पाच गवळणी' या भारूडाला प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद मिळाली. त्यानंतर सादर झालेल्या धनगरी नृत्याच्या तालावर प्रेक्षक थिरकले. तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या 'माझी मैना गावाकडे राहिली' या गाण्याचे सादरीकरण करण्यासोबतच कलाकारांनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे स्मरण करीत हुतात्मांना अभिवादन केले. तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांच्या समर्पित कलाजीवनाचा आलेख मांडणारी लावणी सादर करून रसिकांच्या मनाचा ठाव घेतला. भैरवीने कार्यक्रमाचा मनमोहक शेवट झाला. या कार्यक्रमातून मराठी लोककला, लोकसंस्कृती आणि लोकभावना यांचा रंगतदार मेळ घडला. रसिक प्रेक्षकांनी प्रत्येक सादरीकरणाला भरभरून दाद देत 'फोक प्रबोधन'ला अविस्मरणीय बनवले.


**पारंपरिक वाद्यांची जुगलबंदी ठरली शिखरबिंदू**

बासरी, ढोलकी, डफ, पखवाज, दिमडी, चवंडक, ताशा, हलगी, संबळ, ढोल, टाळ, घुंगरू, हार्मोनियम, झांज, कोल्हापुरी हलगी, तुणतुणे, चंडा अशा पारंपरिक वाद्यांच्या सुमधूर तालाने संपूर्ण वातावरण संगीतमय झाले. महाराष्ट्राच्या मातीतील लय, ठेका आणि सूर यांचा संगम घडवत या वाद्यांची अप्रतिम जुगलबंदी साकारली गेली. वाद्यांच्या तालावर प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले, तर कलाकारांनी आपल्या कौशल्याने रसिकांना अविस्मरणीय अनुभव दिला. पारंपरिकतेचा साज आणि आधुनिक सादरीकरणाची झळाळी यांचा सुंदर मेळ साधत या कार्यक्रमातील ही वाद्यजुगलबंदी खऱ्या अर्थाने शिखरबिंदू ठरली.

**कलाकारांचे प्रेक्षकांकडून कौतुक**

'फोक प्रबोधन' या कार्यक्रमाची मूळ संकल्पना आणि लेखन शेखर नवतरे यांचे असून, निर्मिती पूजा नवतरे यांनी केली आहे. या कार्यक्रमामध्ये ओम शिंदे, पियुष कांबळे, कृष्णा रिटे, प्रणव अवटे, ओंकार दाणे आणि अजिंक्य मोरे यांनी वाद्यवादन केले. साउंड रिदम ओंकार चव्हाण आणि पूजा नवतरे यांनी दिले. विविध गाण्यांचे गायन स्वप्नील कोकाळे, चैत्राली करे, अनिकेत खंडागळे, ओंकार ओटे, श्वेता रनवरे, ऋषिकेश मोरे, प्रज्ञा सावंत, रोहित साठे आणि सागर भोसले यांनी केले. भारूड सादरीकरण गायत्री निकम यांनी, तर बासरीवादन ओंकार सावंत यांनी केले. नृत्यकलाकार सनी शिंदे, प्रियंका वालकोळी, श्वेता रनवरे, प्राची भिलारे, राधा गायकवाड, काजल गोसावी, रोहित राठोड आणि विजय क्षीरसागर यांनी विविध पारंपरिक नृत्यांचे सादरीकरण केले. बॅकस्टेजवर धनंजय थोरात, प्रतीक्षा क्षीरसागर, भाऊसाहेब पाटील, विरेंद्र केरीपाळे, अमेय मगदूम, मोहित शेख आणि अक्षय भोसले यांनी काम केले. उत्कृष्ट निवेदन, सादरीकरण, लयबद्धता आणि सृजनशीलतेसाठी सर्व कलाकारांना प्रेक्षकांनी उत्स्फूर्त टाळ्यांनी दाद दिली.

## वाघोलीत रेकॉर्डवरील गुन्हेगाराचा खून; साथीदारांनीच दगड घालून केली




**पुणे । प्रतिनिधी**

वाघोलीतील उबाळे नगर परिसरात रविवारी पहाटे धक्कादायक घटना घडली. रेकॉर्डवरील गुन्हेगार असलेल्या बादल शेख (वय २४, रा. खराडी) याचा त्याच्याच तीन साथीदारांनी डोक्यात दगड घालून खून केल्याची माहिती समोर आली आहे. ही घटना कृष्णा लॉजसमोर पहाटे सुमारास ३.३० वाजता घडली.

प्राथमिक माहितीनुसार, रात्री उशिरा खराडी परिसरात बादल शेख व त्याचे तीन साथीदार यांच्यात किरकोळ कारणावरून भांडण झाले होते. त्यानंतर चौघेही एका दुचाकीवरून वाघोलीतील उबाळे नगर परिसरात आले. त्यांनी कृष्णा लॉज येथे रूम घेण्याबाबत चौकशी केली. त्याचवेळी पुन्हा त्यांच्यात वाद झाला आणि इतर तिघांनी बादल शेखवर हल्ला चढवला. हल्लेखोरांनी त्याच्यावर वार केल्यानंतर डोक्यात दगड घालून त्याची निर्घृण हत्या केली. घटनेनंतर तिन्ही आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. मृत बादल शेख आणि हल्लेखोर हे सर्वच रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. घटनास्थळी पोलीस पोहोचून पंचनामा करून शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले. हत्येचं कारण आणि आरोपींचा शोध सुरू असून, हद्दीत तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, लोणी काळभोर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे

## पिंपरी लिफ्ट अपघातानंतर तज्ज्ञांचे सोसायट्यांना आवाहन : देखभाल आणि लहान मुलांची काळजी घ्या

**पुणे । प्रतिनिधी**

पिंपरीतील लिफ्ट अपघात ही तांत्रिक समस्या असल्याचे प्रथमदर्शनीत घडलेली चूक दिसत असली तरी यामागे मानवी चुका देखील आहेत. त्यामुळे शहरातील सर्वच सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांनी लिफ्टचे मेन्टनन्स वेळेत आणि अधिकृत व्यक्तीकडूनच करावे, असे आवाहन लिफ्ट अभ्यासक आणि तज्ज्ञांनी सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांना केले आहे. याशिवाय पालकांनी चिमुकल्यांना लिफ्टपासून लांबच ठेवावे, असेही त्यांनी सांगितले.

दसऱ्याच्या दिवशी पिंपरी-चिंचवडमधील चोविसावाडी येथील रामस्मृती हाऊसिंग सोसायटीमध्ये ११ वर्षीय चिमुकल्याचा लिफ्टमध्ये अडकून मृत्यू झाला. त्या घटनेच्या पार्श्वभूमीवर हा अपघात नक्की कशामुळे झाला असेल, त्याची तांत्रिक कारणे काय, असे अपघात टाळण्यासाठी काय काळजी घेणे महत्त्वाचे आहे, यासंदर्भात दै. 'पुढारी'च्या प्रतिनिधीने शनिवारी (दि. ४)लिफ्ट तज्ज्ञ, अभ्यासक आणि पालकांशी संवाद साधला.

त्यावेळी त्यांनी सोसायट्यांमधील लिफ्टचे मेन्टनन्स वेळेत आणि अधिकृत व्यक्तीकडूनच करून घ्यावे, असे आवाहन केले. याचबरोबर पालकांनी मुलांना एकट्याला लिफ्टचा वापर करू देऊ नये, त्याच्या सोबत जावे, असेही सांगितले.

**पालकांनी अशी काळजी घेण्याचे आवाहन...**

मुलांना लिफ्टमध्ये कधीही एकटे पाठवू नका. लिफ्टमध्ये काही बिघाड झाल्यास किंवा मुले आत अडकल्यास त्यांना मदत करण्यासाठी कुणीतरी मोठा माणूस सोबत असणे आवश्यक आहे. लहान मुले लिफ्टमध्ये एकटी असताना घाबरू शकतात.

मुलांना सांगा की, लिफ्टचा दरवाजा उघडताना किंवा बंद होताना त्यापासून दूर थांबावे. अनेक अपघात दरवाजे बंद होत असताना होतात. तसेच, त्यांना दरवाज्यामध्ये हात किंवा पाय घालण्यापासून रोखा.

मुलांना लिफ्टच्या बटणांशी खेळण्यापासून थांबवा. अनेकदा मुले लिफ्टच्या आत बटणे दाबतात. त्यामुळे लिफ्टचा वेग वाढू शकतो किंवा ती मध्येच थांबून अडचण निर्माण होऊ शकते.

जर तुम्ही लहान मुलांसोबत असाल, तर लिफ्टमध्ये असताना त्यांना घट्ट हातात धरून ठेवा किंवा उचलून घ्या. गर्दीच्या वेळी किंवा लिफ्ट वेगाने वर-खाली होताना मुले पडू शकतात. मुलांना लिफ्टमधील इमर्जन्सी बटण आणि अलार्म बटण याबद्दल माहिती द्या. त्यांना सांगा की काही अडचण आल्यास हे बटण दाबून मदतीसाठी बोलावता येते.

## कोंढापुरीत दुर्दैवी अपघात! कंटेनरच्या धडकेत २२ वर्षीय युवतीचा मृत्यू

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

कोंढापुरी (ता. शिरुर) येथे कंटेनरच्या धडकेत युवतीचा मृत्यू झाला. गायत्री गजानन इंगळे (वय २२, रा. इकोग्राम सोसायटी शिक्रापूर, ता. शिरुर), असे मृत्यू झालेल्या युवतीचे नाव आहे. पुणे- नगर महामार्गावरून गायत्री इंगळे ही दुचाकी घेऊन कासारी फाटा येथे कुरिअर आणण्यासाठी जात असताना रस्ता ओलांडण्यासाठी दुभाजकाजवळ थांबलेली असताना अहिल्यानगरच्या दिशेने आलेल्या कंटेनरची गायत्रीच्या दुचाकीला धडक बसली. यात गायत्री गंभीर जखमी झाली.

तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तिचा उपचारापूर्वी मृत्यू झाल्याचे घोषित केले. याबाबत गौतम श्रीराम इंगळे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली. पोलिसांनी कंटेनर चालक राजन कुमार गौतम (रा. दिलीपनगर, उत्तरप्रदेश) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास हवालदार कृष्णा व्यवहारे हे करीत आहेत.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या १९ उमेदवारांना नियुक्ती आदेश वितरीत

**पिंपरी । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या निर्णयानुसार अनुकंपा नियुक्ती बाबतचे सुधारित सर्व समावेशक धोरण जाहीर करण्यात आले आहे. शासनाच्या १५० दिवस कार्यक्रम अंतर्गत आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पात्र उमेदवारांना नियुक्ती पत्र आदेश वितरीत करण्याचा कार्यक्रम मुबई येथे संपन्न झाला. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात दृकश्राव्य प्रणालीद्वारे जिल्ह्यातील अशा पात्र उमेदवारांना देखील नियुक्ती आदेश देण्यात आले यामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या १९ उमेदवारांचा समावेश होता. यामध्ये अनुकंपा वारस नियुक्ती १२ उमेदवारांना तर लाड समिती शिफारस वारस नियुक्ती ७ उमेदवारांना नियुक्ती पत्र आदेश वितरीत करण्यात आले.



मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्यासह प्रमुख मान्यवरांची उपस्थिती होती. तर पुणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी गजानन पाटील यांच्यासह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सह आयुक्त मनोज लोणकर देखील उपस्थित होते. राज्य शासनाने अनुकंपा उमेदवारांना नियुक्ती पत्र वितरणाचा राज्यस्तरीय कार्यक्रम आयोजित केला होता. यामध्ये लिपिक पदासाठी अभिजित जाधव, समीक्षा इंदुलकर, सुशांत फलके, व्यंकटेश गोणे, शिपाई पदासाठी दीपक नवले, साहिल काशिद, नयना हुंबरे, संकेत यादव, मजूर पदासाठी गणेश पडवळ, प्रीतम कडलग स्पे कुली पदासाठी मनीष लोहारे, अमृत कांबळे,सफाई कामगार पदासाठी रोहन लोंढे, अर्चना पाथरकर, विशाल वाघमारे, श्रीदेवी गायकवाड, अजिंक्य काळोखे, प्रवीण पोटे, अभिषेक केदारी यांचा समावेश आहे.

## धक्कादायक! स्कुटरचा धक्का लागल्याच्या क्षुल्लक वादातून घरात घुसून तरुणाचा खून

पुणे । प्रतिनिधी

स्कुटरचा धक्का लागल्यावरुन झालेल्या वादात एका तरुणाचा घरी घुसून खून करण्यात आला. फरार आरोपींना रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी अवघ्या दोन तासात अटक केली.याबाबत अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे म्हणाले की, शुक्रवारी सायंकाळी कोरेगाव येथील यशईन चौकात मोहम्मद शकील मोहम्मद हाजी आणि त्याचा भाऊ सिद्दीकी मोहम्मद मुजम्मील मोहम्मद हाजी यांना स्कुटीवरील ओंकार वाळके आणि साथीदाराने धक्का दिला. यावरून झालेल्या किरकोळ वादाचा राग आरोपींनी मनात धरला. यानंतर शनिवारी पहाटे अडीचच्या सुमारास ओंकार वाळके व साथीदार हे दोघा भावांच्या राहत्या घरी गेले. त्यांनी लाकडी दांडके, प्लास्टिक पाइप आणि हाताने मारहाण केली. यात सिद्दीकी मोहम्मद गंभीर जखमी होऊन जागीच मरण पावला. त्याचा भाऊ शकील याला गंभीर दुखापत झाली. जखमी शकीलच्या फिर्यादीवरून रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. आरोपी गुन्ह्यानंतर फरार झाले होते. तातडीने शोधमोहीम राबवून ओंकार सिताराम वाळके आणि विजय ज्ञानेश्वर जगधने (दोघेही रा. कोरेगाव, ता. शिरूर) यांना अवघ्या दोन तासांत अटक केली.

## बदला तो फिक्स, आता फक्त; आंदेकर टोळीच्या समर्थनार्थ भडक पोस्ट्स, पोलिसांनी दाखवला चांगलाच इंगा

**पुणे । प्रतिनिधी**

आंदेकर टोळीविरोधातील पोलिस कारवाईनंतर त्यांच्या समर्थकांनी सोशल मीडियावर भडक संदेश पोस्ट करून कायदा-सुव्यवस्थेला आव्हान दिले आहे. या प्रकरणी समर्थ पोलिसांनी तत्पर कारवाई करत पाच आरोपींना अटक केली असून त्यांची पोलिसांनी धिंड काढली आहे. मंथन सचिन भालेराव, फैजान शेख, पियुष बिडकर, अथर्व नलावडे, ओंकार मेरगु असं अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

समर्थ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी इंस्टाग्राम अकाउंटवर इरवश्रर ीं षळु, ीशश्रिू हेसर. -रींर षरज्ञीं लेवू ेर ज्ञीींूपे असा उचकावणारा स्टेटस ठेवून आंदेकर टोळीच्या समर्थनार्थ हिंसक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणातील पाचही







आरोपींना शनिवारी (दि. ४ ऑक्टोबर) अटक करण्यात आली आहे. हे आरोपी आंदेकर टोळीशी सोशल मीडियाद्वारे जोडलेले असून, पोलिसांच्या अलीकडील कारवाईनंतर त्यांनी सूडभावनेतून भडक पोस्ट्स टाकल्या होत्या, अशी माहिती पोलिस तपासात उघड झाली आहे. तपास अधिक गतीने सुरू असून, आरोपींनी हे पोस्ट्स कोणत्या गटाच्या किंवा व्यक्तीच्या सांगण्यावरून टाकले, तसेच आंदेकर टोळीशी त्यांचा नेमका संबंध किती खोलवर आहे, याचा शोध पोलिस घेत आहेत. वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांनी दिलेल्या माहितीनुसार, अशा प्रकारचे पोस्ट टाकणे हे केवळ कायद्याचा अनादर नाही, तर सार्वजनिक शांतता भंग करण्याचा प्रयत्न आहे. सोशल मीडियावर द्वेषपूर्ण किंवा हिंसाचाराला प्रवृत्त करणारे संदेश पोस्ट करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे ते म्हणाले.

## शिरूरच्या बेट भागात चोरट्यांचा धुमाकुळ, तब्बल चार ठिकाणी लुटमारीच्या घटना

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील कवठे येमाई, सविंदणे आणि टाकळी हाजी परिसरात पुन्हा एकदा चोरट्यांनी दहशत माजवली आहे. केवळ दोन दिवसांत (दि. ४ व ५ ऑक्टोबर) चार वेगवेगळ्या चोरी व लुटीच्या घटना घडल्याने बेट भागात भीतीचे सावट पसरले आहे. शनिवारी (दि. ४) दुपारी घडलेल्या पहिल्या घटनेत माळवदेवस्ती (कवठे येमाई) येथील ७७ वर्षांच्या पुर्णाबाई भीमा पडवळ या वृद्ध महिलेला गुरे चारत असताना दोन मोटारसायकलस्वार चोरट्यांनी लुटले.

हे दोघे तरुण दिशा विचारण्याच्या बहाण्याने जवळ गेले आणि अचानक वृद्धेच्या गळ्यातील ८.५ ग्रॅमचे मंगळसूत्र आणि ६ ग्रॅम वजनाचा बदाम आकाराचा दागिना हिसकावून घेतला. पुर्णाबाईंनी आरडाओरडा करत प्रतिकार केला असता चोरट्यांनी त्यांचे तोंड दाबण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांच्या आरडाओरडामुळे मुलगा बाबाजी पडवळ आणि नातू सार्थक धावत येत असल्याचे पाहून चोरटे मिडगुलवाडीच्या दिशेने पळाले.

यानंतर पाचच्या सुमारास दुसऱ्या घटनेत सविंदणे येथील सीताबाई बाळासाहेब पोखरकर या महिला रस्त्याच्या कडेला बसल्या असताना त्यांच्या गळ्यातील चार ग्रॅम सोन्याचे मणी



हिसकावून दोन चोरटे पसार झाले. दरम्यान, त्याच रात्री कवठे येमाई येथील ढाकीवस्ती नजीक वास्तव्यास असलेल्या नाथा भगवंत वागदरे आणि त्यांच्या पत्नी लीलाबाई वागदरे यांच्या घरात चोरट्यांनी घुसून हल्ला केला. दोघांनाही डांबून ठेवून ११ शेळ्या, ४ करडे आणि रोख रक्कम असा माल लंपास केला. चोरट्यांनी दाम्पत्याला दोरीने बांधून जबर मारहाण केली, तसेच लीलाबाईंना डोळ्याजवळ गंभीर दुखापत झाली. घटनेनंतर त्यांनी शेतकरी गणपत सांडभोर यांना माहिती दिली. रविवारी (दि. ५) सायंकाळी पाचच्या सुमारास टाकळी हाजी गावातील कुंड रस्त्यावर पुन्हा एक घटना घडली. मोटारसायकलवर आलेल्या दोन चोरट्यांनी ताराबाई तबाजी मंदिलकर या वृद्ध महिलेला लुटत त्यांच्या गळ्यातील एक तोळ्याचे मंगळसूत्र हिसकावून घेतले आणि पलायन केले. दरम्यान, पोलीस निरीक्षक संदेश केंजळे, उपनिरीक्षक दिलीप पवार, पोलीस हवालदार अनिल आगलावे व पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. सध्या या सलग घटनांमुळे शिरूर तालुक्यातील बेट भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांमधून पोलीस गस्त वाढवून चोरट्यांना गजाआड करण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

## सोनम वांगचुक देशद्रोही की पर्यावरणाचे रक्षक? पुण्यातून सरकारला थेट सवाल, तात्काळ सुटकेची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

लडाखमधील सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांना केंद्र सरकारने केलेल्या अटकेविरोधात शनिवारी पुण्यात निदर्शने करण्यात आली. वांगचुक यांना काही दिवसांपूर्वी राष्ट्रीय सुरक्षा कायद्यान्वये अटक करण्यात आली असून त्यांच्या विरोधात काही गंभीर आरोप करण्यात आले आहेत. मात्र, वांगचुक यांच्यावर झालेले आरोप खोटे असून त्यांचे जाणीवपूर्वक चारित्र्यहनन सुरू आहे, वांगचुक लडाखमधील विनाशकारी विकासाला विरोध करत असल्याने त्यांची व त्यांच्यासोबत अटक झालेल्या सर्व लडाखी कार्यकर्त्यांची ताबडतोब सुटका करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

२०१९ मध्ये कलम ३७० रद्द




झाल्यानंतर लडाखला केंद्रशासित प्रदेश झाला आहे. त्यानंतर सातत्याने लडाखला स्वतंत्र राज्याचा दर्जा दिला जावा आणि त्याचे संविधानाच्या सहाव्या सुचित समावेश करावा, यासाठी वांगचुक यांनी आंदोलन करत होते. काही दिवसांपूर्वी त्यांनी या मागणीसाठी उपोषण पुकारले होते. त्यांच्या उपोषणाकडे सरकारने बऱ्यापैकी कानाडोळा केला होता. त्यानंतर पेटलेल्या आंदोलनात मोठ्या प्रमाणात हिंसाचार झाला. त्यानंतर वांगचुक यांना अटक करत अज्ञात ठिकाणी हलविण्यात आले आहे.

एकीकडे विकासाच्या नावाखाली जमिनी अधिग्रहीत करून जंगले, पाणी व जमीनीवरील लोकांचे हक्क हिरावून देशाची साधन संपत्ती अदानी अंबानीच्या घशात घातली जात आहे आणि सामान्य नागरिकांना देशोधडीला धाडले जात आहे, तर दुसरीकडे धर्म, जाती, जमाती भाषा आदींच्या आधारावर फूट पाडण्याचा उद्योग भाजपकडून केला जात आहे. रोजगार, अन्न, शेतीमालाचा हमीभाव, शिक्षण, आरोग्य सेवा इत्यादीं सारख्या सामान्य माणसाच्या प्रश्नांवरून जाणीवपूर्वकरित्या लक्ष हटविले जात आहे. राजकीय नेत्यांचे हितसंबंध असल्याने पाकिस्तानसोबत क्रिकेट सामना खेळला जात आहे, मात्र, दक्षिण आशियाच्या हवामान बदलावरील परिषदेसाठी पाकिस्तानला गेलेल्या वांगचुक यांना देशद्रोही म्हटले जात आहे, यामागचा विरोधाभास आणि ढोंगीपणा लक्षात घेतला पाहिजे. त्यामुळे या अन्यायाचा आणि सरकारी दडपशाहीचा निषेध करत वांगचुक आणि इतर आंदोलकांच्या तात्काळ सुटकेची मागणी आम्ही करत असल्याचे आंदोलकांनी म्हटले आहे.